RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

६ शुक्रवार फेब्रुवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २५२

✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी? मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!

१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!

कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.

घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:

9975532291/9096945629

# आता शासकीय, कार्यालयात अभिप्राय पेटी

## उपयुक्त सूचनांची तत्काळ अंमलबजावणी, शासन घेणार दखल...

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा :**



राज्य शासनाच्या अख्त्यारितील शासकीय, निमशासकीय कार्यालयात आता तक्रार पेटी च्या धर्तीवर 'अभिप्राय पेटी' राहणार आहे. या पेटीत कार्यालयात येणाऱ्या नागरिक, लाभार्थी एवढेच नव्हे कर्मचाऱ्याना सुद्धा आपले अभिप्राय नोंदविण्यात येणार आहे. दर महिन्याच्या ठराविक तारखेला ही पेटी उघडण्यात येणार असून त्यावर कार्यालय प्रमुख अंमलबजावणी करणार असून संबंधित विभागाच्या सचिवाना अहवाल सादर करणार आहे. त्यावर राज्य शासनही निर्णय घेणार आहे.

राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्थाना अभिप्राय पेटी योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सुचना राज्याच्या प्रधान सचिवाकडून देण्यात आल्या आहेत. कार्यालयांमध्ये सुचना किंवा तक्रार पेटी ठेवण्याची पद्धत पूर्वीपासुन अस्तित्वात आहे. मात्र याचा कार्यालय कामकाजाबाबत सुधारणेच्या दृष्टीने फारसा उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे अभिप्राय पेटी ची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. लोकाभिमुख, पारदर्शक, उत्तरदायी व कार्यक्षम प्रशासन निर्माण करणे हा यामागील उद्देश आहे.पुरविल्या जाणाऱ्या सेवामध्ये नागरिकांना येणाऱ्या अडचणी, मिळणारी मदत, कार्यालयीन वातावरण, अधिकारी व कर्मचारी यांची वर्तणूक, कामकाजातील सुलभता किंवा विलंब याबाबतचा त्यांचा अनुभव 'अभिप्राय' मधून उमटणे अपेक्षित आहे. कर्मचारी देखील आपल्या विभागातील कामकाज अधिक चांगले होण्यासाठी आपले अभिप्राय देऊ शकतील. नागरिकांच्या अनुभवांच्या प्रशासनाला आत्मपरीक्षणाची संधी मिळेल, शासकीय कामकाजात गतिमानता, सुलभता व गुणवत्ता वाढीस लागेल, असा यामागचा प्रशासकीय आशावाद आहे.

■ **कार्यालयामध्ये नागरिकांसाठी विहीत नमुन्यातील अभिप्राय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कागदावर लिहून अभिप्राय देण्याचा पर्याय सुद्धा आहे. कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी कुलूपबंद अभिप्राय पेटी ठेवण्यात येणार आहे. अभिप्राय मध्ये कार्यालयीन स्वच्छता, सेवा पद्धत, नागरिकांशी वागणूक, कामकाजातील सुलभता, या मुद्द्यांवर १ ते ५ इतके गुणांकन सादर करता येईल. तसेच त्यांना आलेल्या अनुभवांवर मुक्त स्वरूपात त्यांचे अभिप्राय नोंदवून सदर अभिप्राय कुलूपबंद पेटीमध्ये टाकण्याची मुभा देखील राहणार आहे. कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी सुद्धा लोकाभिमुख प्रशासनासाठी मते मांडू शकणार आहे.**

# राज्यभरातील परिचारिका संतप्त

**▸विदर्भ केसरी। नागपूर**

: महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या नियमानुसार परिचारिकांची नोंदणी (लायसन्स) नूतनीकरणासाठी पाच वर्षांत १५० 'क्रेडिट पॉईंट' अनिवार्य आहे. ते पूर्ण करण्याच्या व्यवस्थेतील त्रुटी, रुग्णालयांत मनुष्यबळाची कमतरता आणि 'सीएमई'च्या नावाखाली सुरू असलेली आर्थिक लूट यामुळे परिचारिका संतापल्या आहेत. या मुद्द्यावर काही घटनांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे.

महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या नियमानुसार प्रत्येक पाच वर्षांत परिचारिकांना नोंदणी नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. त्यासाठी ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने ज्ञानवर्धन करणाऱ्या सीएमई, कार्यशाळांमधून १५० 'क्रेडिट पॉईंट' मिळवणे आवश्यक आहे. २०२७ मध्ये नोंदणी नूतनीकरणाची मुदत संपत असताना, आजही मोठ्या संख्येने परिचारिकांचे 'क्रेडिट पॉईंट' अपूर्ण आहेत.

परिचारिकांनी ऑनलाईन सीएमई पूर्ण करूनही अनेकदा 'क्रेडिट पॉईंट' प्रणालीत दिसत नाहीत. काही ऑनलाईन सीएमईमध्ये उपस्थितीची मर्यादा असल्याने अडचण निर्माण होते. वैद्यकीय शिक्षण खाते आणि सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णालयांत मोठ्या प्रमाणात परिचारिकांची पदे रिक्त असताना, उपलब्ध मनुष्यबळावरच रुग्णसेवेचा भार आहे. अशा परिस्थितीत सीएमईसाठी सुट्टी मिळणे कठीण आहे.

दरम्यान एखाद्या रुग्णालयातील परिचारिका एकत्रित सीएमईला गेल्यास रुग्णसेवेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. परिणामी, क्रेडिट पॉईंट मिळवताना परिचारिकांची अक्षरशः दमछाक होत आहे. या गोंधळातच काही संस्था आणि संघटनांनी 'सीएमई'च्या नावाखाली ५०० ते १,००० रुपयांपर्यंत शुल्क आकारण्यास सुरुवात केल्याने परिचारिकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, ऑनलाईन सीएमई पूर्ण करूनही 'क्रेडिट पॉईंट' प्रणालीत नोंद न झाल्याने अनेक परिचारिकांमध्ये नोंदणी नूतनीकरणाबाबत भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे शासनाने यात हस्तक्षेप करूनविश्वासार्ह ऑनलाईन सीएमई व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

■ **केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी कर्मयोगी (आयगॉट) ॲपवर सवलतीच्या वेळेत ज्ञान अद्ययावत करण्याची सुविधा आहे. ती ग्राह्य धरली जाते. भारतीय परिचर्या परिषदेनेही नि:शुल्क प्रशिक्षण देण्याचे निर्देश दिले आहे. मात्र, प्रत्यक्षात ऑफलाईन सीएमईसाठी पैसे आकारून परिचारिकांची लूट सुरू आहे. ज्ञान अद्ययावतीकरणाला विरोध नाही, पण नोंदणी नूतनीकरणासाठी 'क्रेडिट पॉईंट'ची सक्ती चुकीची आहे. परिषदेने कर्मयोगी ॲपच्या धर्तीवर व्यवस्था करून परिचारिकांना दिलासा द्यावा. - प्रेम बोबडे, राज्याध्यक्ष, राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ.**

■ **परिचारिकांच्या ज्ञान अद्ययावतीकरणाला कुणाचाही विरोध नाही. मात्र, शासन, रुग्णालय प्रशासन आणि महाराष्ट्र परिचर्या परिषद यांनी एकत्र येऊन प्रत्येक रुग्णालयात नि:शुल्क सीएमई व कार्यशाळा आयोजित करायला हव्यात. ऑफलाईन कार्यशाळांसाठी पैसे आकारून सेवा क्षेत्राचे बाजारीकरण करणे अयोग्य आहे. काही ऑनलाईन कार्यशाळांनंतरही 'क्रेडिट पॉईंट' दिसत नसल्याने परिचारिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. - कल्पना विंचूरकर (रोडे), सरचिटणीस, महाराष्ट्र गव्हरमेंट विदर्भ नर्सेस असोसिएशन.**

## वेश्याव्यवसायावर छापा, २ महिलांची सुटका

**▸विदर्भ केसरी। पुणे :**

उत्तमनगर परिसरातील योगीराज कॉम्प्लेक्स सरस्वतीनगर येथे सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कारवाई केली. यावेळी दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, याप्रकरणी, गौरी विकास पवळे (४५, रा. बधे कॉम्प्लेक्स, उत्तमनगर) हिच्याविरोधात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुधवारी (दि. ४) ही कारवाई करण्यात आली. सरस्वतीनगर उत्तमनगर येथील योगिराज कॉम्प्लेक्समधील पहिल्या मजल्यावर वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने बनावट ग्राहक पाठवून खात्री केली असता, तेथे पीडित महिलांना पैशांचे प्रलोभन दाखवून गौरी पवळे ही वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे समोर आले. त्यानुसार पथकाने सापळा रचून साध्या वेश्यात छापा टाकला. ही कामगिरी पोलिस निरीक्षक छगन कापसे, पोलिस उपनिरीक्षक विशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

## दुकानाला भीषण आग; ३० लाखांचे नुकसान,

**▸विदर्भ केसरी। केज (बीड):**

एका बाजूला लग्नाची लगबग आणि आनंदाचे वातावरण असताना, दुसरीकडे नियतीने मात्र अत्यंत क्रूर डाव मांडला. केज येथील शिक्षक कॉलनी परिसरात असलेल्या एका प्लम्बिंगच्या दुकानाला बुधवारी मध्यरात्री अचानक आग लागली. या आगीत नवरदेव असलेल्या दुकानदाराचे ३० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. धक्कादायक म्हणजे, ज्या दिवशी दुकानदाराची हळद आणि लग्न होते, त्याच दिवशी ही घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

बुधवारी मध्यरात्री अडीचच्या सुमारास केज पोलीस ठाण्याचे पथक गस्त घालत असताना त्यांना धुराचे लोट दिसले. त्यांनी वेळ न घालवता तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले. सुमारे एक तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. पोलिसांनी वेळीच दखल घेतल्यामुळे ही आग शेजारच्या दुकानांपर्यंत पसरली नाही, अन्यथा संपूर्ण मार्केट आगीच्या विळख्यात आले असते.

# धक्कादायक! तब्बल ४ लाख गुरुजी नापास!

**▸विदर्भ केसरी। वर्धा :**



शिक्षक पण शिकविण्यास पात्र असावे म्हणून राज्य शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा घेणे सूरू केले आहे. विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षक वृंद पण 'तावून सुलाखून' निघणार असतील तर उत्तम. हा त्यामागचा हेतू शासनाने ठेवला.पण बघतो तर काय, चक्क नापास झालेले अधिक निघाले, असा निकाल पुढे आला आहे. शिक्षकांची पात्रता ठरविणाऱ्या महा टीईटी २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. हा निकाल शिक्षण क्षेत्रास चांगलाच धक्का देणारा ठरत असल्याची शैक्षणिक वर्तुळ प्रतिक्रिया देत आहे.

राज्यात मोठ्या संख्येने शिक्षक पात्र होण्यास इच्छुक उमेदवारांनी ही परीक्षा दिली होती. केवळ ११ टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले आहे. म्हणजे ३ लाख ९६ हजार पेक्षा अधिक उमेदवार विद्यार्थी नापास झाल्याची ही आकडेवारी आहे. आता जर गुरुजी हेच या मोठ्या प्रमाणात नापास होत आहे, तर गुणवत्ता कशी सिद्ध करणार, असा प्रश्न उपस्थित केल्या जाऊ लागला आहे. उद्याची पिढी घडविणाऱ्या शिक्षकांची पात्रता ठरविणाऱ्या महा – टीईटी परीक्षेत हे आता दिसून आले आहे. गुरुजी वर्ग जर असे लाखात नापास असतील, तर मुलं घडणार कसे, असा प्रश्न.

राज्य परीक्षा परिषदेकडून जाहीर करण्यात आलेली माहिती अशी. एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी या महा टीईटी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात ४ लाख ४६ हजार ७३० उमेदवार विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षा देण्यास उपस्थित झाले होते. म्हणजे २८ हजार ९३८ विद्यार्थी हे गैरहजर राहले, अशी आकडेवारी आहे. अंतिम निकाल लागला. त्यात फक्त ५० हजार ३६९ उमेदवार विद्यार्थी पात्र ठरले. आणि उर्वरित ३ लाख ९६ हजार ३२५ उमेदवार नापास म्हणजे अनुतीर्ण झाले आहेत. पेपर १ व पेपर २ या दोन्ही पातळी वर नापास होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. हीच बाब चिंतेची समजल्या जात आहे.

■ **इयत्ता पहिली ते पाचवीसाठी असलेल्या पेपर एक मध्ये २ लाखा पेक्षा अधिक उमेदवार यांनी नोंदणी केली होती. जाहीर करण्यात आलेल्या निकालात माध्यम निहाय आणि विषय निहाय यात मोठे अंतर असल्याचे निरीक्षण आहे. कन्नड माध्यमाचा निकाल अती उत्तम तुलनेने चांगला लागला आहे. या विषयात १५ टक्के वर निकाल असल्याची नोंद झाली आहे.**

■ **मराठी, हिंदी व तेलगू माध्यमाचा निकाल जेमतेम सरासरी आसपास आहे. तर उर्दू, इंग्रजी व प्रामुख्याने गुजराती माध्यमातील निकालाची टक्के वारी अत्यंत कमी असल्याचे निकाल सांगतो. गणित, विज्ञान व सामाजिक विज्ञान या विषयात अपेक्षा होती त्यापेक्षा कमी निकाल लागला आहे. उपस्थित उमेदवारपैकी केवळ ११. ४७ टक्केच उमेदवार उत्तीर्ण झाले. पेपर दोन मध्ये म्हणजे इयत्ता सहावी ते आठवी साठी घेण्यात आलेल्या परीक्षेत तर वेगळी स्थिती दिसून आली नाही. या परीक्षेत पण निकाल ११. १२ टक्के असा मर्यादित राहिल्याची नोंद पुढे आली आहे.**

## दोन अल्पवयीन मुलांकडून अडीच लाखांचे एमडी जप्त

**▸विदर्भ केसरी। पुणे:**

एमजी रोड कॅम्प परिसरातील एका शाळेसमोर गुन्हे शाखेच्या पथकाने दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून २ लाख ६० हजार रुपये किमतीचे १३ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त केले.

दोघांनी एमडी नशा करण्यासाठी स्वतःजवळ बाळगले असल्याचे तपासात समोर आले आहे. याप्रकरणी, पोलिस हवालदार विशाल दळवी यांनी लष्कर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखा युनिट दोनचे पथक मंगळवारी (दि. ३) रात्री पावणे आठच्या सुमारास गस्तीवर होते. त्यावेळी त्यांना रस्त्याच्या कडेला उभे असलेले दोन संशयित तरुण कोणाची तरी वाट पाहत असल्याचे दिसून आले. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांना अडवून चौकशी केली. चौकशीत दोघांचे वय १८ वर्षांखालील असल्याचे निष्पन्न झाले. तपासणीदरम्यान त्यांच्याकडून पांढऱ्या रंगाची पावडर आढळून आली. फील्ड टेस्ट किटद्वारे तपासणी केली असता ते एमडी असल्याचे स्पष्ट झाले. इलेक्ट्रॉनिक वजनकाट्याने वजन केल्यावर त्याचे एकूण वजन सुमारे १३ ग्रॅम असल्याचे आढळले. पुढील तपासासाठी हा नमुना फॉरेन्सिक प्रयोगशाळेत पाठवण्यात आला आहे.

# छत्तीसगड सीमेवर एका नक्षल्याचा खात्मा !

**▸विदर्भ केसरी। गडचिरोली :**



नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्यात घुसून सी-६० च्या जवानांनी पुन्हा एकदा आपल्या शौर्याचा परिचय दिला. भामरागड उपविभागातील छत्तीसगड सीमेलगतच्या घनदाट जंगलात झालेल्या भीषण चकमकीत ५ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी एका नक्षलवाद्याला कंठस्नान घातले.

या कारवाईत नक्षलवाद्यांचे दोन मोठे तळ उद्ध्वस्त करण्यात आले. दरम्यान, नक्षल्यांच्या भ्याड गोळीबारात सी-६० चा एक जवान जखमी झाला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ३ फेब्रुवारीच्या संध्याकाळी पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, नक्षलवाद्यांच्या 'कंपनी क्रमांक १०' आणि छत्तीसगडमधील एका दलमचे सदस्य फोदेवाडा जंगल परिसरात मोठ्या हल्ल्याच्या तयारीत आहेत. ही माहिती मिळताच विलंब न लावता भामरागडच्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात सी-६० च्या १४ पथकांनी रात्रीच्या अंधारातच जंगलाला वेढा टाकला. ४ रोजी दिवसा झालेल्या पहिल्या चकमकीत जवानांनी आक्रमक पवित्रा घेत नक्षलवाद्यांचे दोन तळ उद्ध्वस्त केले. मात्र, घनदाट झाडीचा फायदा घेत नक्षलवादी पसार झाले. ५ रोजी सकाळी पुन्हा मोहिमेला धार चढवण्यासाठी अतिरिक्त ४ पथके आणि सीआरपीएफच्या तुकडीला पाचारण करण्यात आले. दुपारी जवानांना एका नक्षल्याचा मृतदेह सापडला असून, त्याच्याजवळ जप्त केलेली शस्त्रे पाहता तो मोठा कमांडर असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# संतापलेल्या तरुणाने दगडाने ठेचून संपवले

**▸विदर्भ केसरी।**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात गुन्हेगारीच्या घटनांनी पुन्हा एकदा डोकं वर काढलं आहे. एका अत्यंत क्षुल्लक आणि धक्कादायक कारणावरून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना तळेगाव दाभाडे परिसरात घडली आहे.

केवळ आईवरून शिवी दिली, या रागाच्या भरात एका तरुणाने दुसऱ्याचा दगडाने ठेचून खून केला. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, मयत संतोष पवार आणि आरोपी सनी चव्हाण हे दोघेही सोमाटणे फाटा येथील जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत असलेल्या मैदानात क्रिकेटचा सामना पाहत होते. विशेष म्हणजे हे दोघेही एकमेकांसाठी पूर्णपणे अनोळखी होते. एकाच कट्ट्यावर बसून सामना पाहत असताना त्यांच्यात कोणत्यातरी कारणावरून किरकोळ बाचाबाची झाली. या वादादरम्यान मयत संतोष पवार याने आरोपी सनी चव्हाण याला आईवरून शिवीगाळ केली. ही शिवी सनीच्या जिव्हारी लागली आणि त्याचा रागावरील ताबा सुटला. संतापलेल्या सनीने तिथेच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि संतोषच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. हा घाव इतका भीषण होता की संतोषचा जागीच मृत्यू झाला. सायंकाळी साडेपाच ते सहाच्या सुमारास ही घटना घडल्याने मैदानात एकच पळापळ झाली.

### पोलिसांनी आरोपीला ठोकल्या बेड्या

■ **घटनेची माहिती मिळताच तळेगाव दाभाडे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. अवघ्या काही वेळातच पोलिसांनी आरोपी सनी चव्हाण याला ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत. "केवळ शिवीगाळ केल्याच्या रागातून ही हत्या झाल्याचे प्राथमिक तपासात दिसत आहे," अशी माहिती पोलिसांनी दिली.**

### नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण

■ **या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. तरुणांमध्ये संयमाचा अभाव आणि वाढत्या रागामुळे अशा छोट्या कारणावरून हत्या होणे, ही गंभीर बाब असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये आहे. सध्या तळेगाव दाभाडे पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.**

# काँग्रेसमधला कलह दिल्लीत मिटला

**▸विदर्भ केसरी।**



अखेर चंद्रपूर काँग्रेसमधील विधिमंडळ नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील अंतर्गत कलह दिल्ली दरबारी मिटल्याचे समोर आले आहे. त्यानुसार चंद्रपूर महापालिकेचे महापौरपद धानोरकर गटाकडे, तर उपमहापौरपदी वडेट्टीवारांच्या समर्थकाची वर्णी लागणार आहे. या ठिकाणी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेलाही सत्तेत वाटा मिळणार आहे.

गेले काही दिवस चंद्रपूर महापालिकेतील काँग्रेस बाबत संभ्रमाचे वातावरण होते. त्यात आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अंतर्गत वाद सुरू होता. मात्र, दिल्लीत काँग्रेस पक्षश्रेष्ठींशी चर्चा केल्यानंतर अखेरीस आज त्यावर तोडगा निघाला.

चंद्रपूर वादावर विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले की, 'महाराष्ट्र काँग्रेस आणि दिल्लीतून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार खासदार प्रतिभा धानोरकर आणि गटनेता राजेश अरुण म्हणतील तो महापौर होईल. काँग्रेसचे गटनेता म्हणून राजेश अडूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपमहापौरपदी आमचे वसंत देशमुख यांनी अर्ज भरला आहे. मात्र, आम्ही महापौर पदाचा अर्ज भरला नाही. तर धानोरकरांकडून चार महिलांनी अर्ज भरलेत. आज संध्याकाळी काँग्रेसची गटनोंदणी होणार आहे.'

वडेट्टीवार म्हणाले की, 'उपमहापौर पदी अनुभवी आमचे समर्थक वसंत देशमुख यांनी अर्ज भरला, तर गटनेते पदी वडेट्टीवार समर्थक राजेश अडूर यांची नियुक्ती करण्यात आली. राजेश अडूर यांच्या नियुक्तीचे पत्र देखील पक्षाकडून अधिकृतरित्या विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून देखील आज महापौर पदी अर्ज दाखल करण्यात आला आहे. उपमहापौर पदी देखील खासदार धानोरकर यांच्या समर्थकांकडून अर्ज दाखल करण्यात आला आहे. याबाबत चर्चा होऊन अर्ज मागे घेण्यात येईल.'

वडेट्टीवार म्हणाले की, 'सध्या काँग्रेसकडे 27 नगरसेवक असून जनविकास सेना पप्पू देशमुख यांचे 3 नगरसेवक काँग्रेसबरोबर आहेत. त्यांना MIM पक्षाने पाठिंबा दिल्याने ते 1 नगरसेवक जनविकास सेनेबरोबर आहे. बसपाने देखील काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे सध्या 32 चे संख्याबळ असून अजून 2 नगरसेवकांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. याबाबत सर्व स्तरावर चर्चा सुरू आहे. चंद्रपूर महापालिकेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला स्थायी समिती देण्याची तयारी काँग्रेसने दर्शवली असून, त्या पक्षातील पक्षश्रेष्ठींशी चर्चा सुरू असून अंतिम निर्णय लवकरच होईल.

# भीषण अपघात; दोन तरुणांचा मृत्यू, चार गंभीर

**▸विदर्भ केसरी।मूर्तिजापूर**



उमरी अरबजवळ एका भरधाव कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

पोलीस स्टेशन ग्रामीण कडून मिळालेल्या माहितीनुसार, कारमधील सर्व प्रवासी कारंजा येथील रहिवासी होते.मूर्तिजापूर मार्गे कारंजा जात असतांना भरधाव वेगात असलेल्या कारवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. अपघातातील मृतांची नावे १. रोहित भगवानदास रील वय २५ वर्षे, रा. वाल्मिक नगर, कारंजा २. संकेत राजेश मेश्राम वय २५ वर्षे, रा. गवळीपुरा, कारंजा

**अपघातातील जखमींची नावे:** १. यशवंत घनश्याम राठोड वय ३१ वर्ष, रा. कारंजा २. अक्षय संजय रोकडे वय २७ वर्ष, रा. दादगाव, ता. कारंजा ३. ओम दीपक मुंदे वय १९ वर्ष, रा. कारंजा ४. आर्यन अमोल अंभोरे वय १९ वर्ष, रा. कारंजा. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.अधिक माहिती ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय चंदन वानखेडे,ए एस आय दिपक कानडे,पोहेकॉ शंकर खेडकर, गणेश ठाकरे, गजानन सयाम, रामहरी केंद्रे पुढील अपघाताची सविस्तर माहिती चौकशी करून देणार आहे.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ | २

## अग्रलेख

# मनरेगा

मनरेगाने ग्रामीण भारताला हक्काचा रोजगार देत आर्थिक व सामाजिक सबलीकरणाची भक्कम पायाभरणी केली. ग्रामीण गरिबांच्या न्याय्य हक्कांसाठी मनरेगाच कायम ठेवणे अपरिहार्य आहे. सन 2004-09 या यूपीए-1 च्या पहिल्या पाच वर्षांच्या काळात जनसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अनेक महत्वपूर्ण योजना सुरू केल्या. यामध्ये 2009 सरकारने केलेला 'महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा' (मनरेगा) हा सर्वात ऐतिहासिक होय. तेव्हा मी योजना आयोगाचा सदस्य आणि श्रम मंत्रालयाचा प्रमुख होतो. त्यामुळे 'मनरेगा'चे अंतिम स्वरूप ठरवण्यात मला सक्रिय सहभाग घेता आला. महाराष्ट्रात 1972-73 मध्ये पडलेल्या भयावह दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 1974 मध्ये 'रोजगार हमी योजना' कायदा करण्यात आला व राज्यात अंमलबजावणी सुरू झाली. रोहयोमुळे गरीब ग्रामीण जनतेला आर्थिक दिलासा मिळाला. मागणी केल्यावर रोजगाराची हमी मिळाली. सोनिया गांधी अध्यक्ष असलेल्या राष्ट्रीय सल्लागार समितीने ग्रामीण भागातील दारिद्र्य ध्यानात घेऊन महाराष्ट्रातील ही 'रोहयो' राष्ट्रीय स्तरावर सुरू करण्याची शिफारस केली. सहा महिने विचारमंथन होऊन योजना आयोगाने तिला अंतिम स्वरूप दिले. शेवटी तिला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. 'मनरेगा' ही केंद्रीय (केंद्र पुरस्कारित नव्हे, जिच्यामध्ये केंद्र व राज्ये यांच्यात खर्चाची विभागणी केली जाते.) योजना असल्यामुळे तिच्यावरील पूर्ण खर्च केंद्र सरकार करीत असे. योजनेतील रोजगारनिर्मितीचे नियोजन आणि अंमलबजावणी ग्राम, तालुका आणि जिल्हा पंचायत आपापल्या विभागातील गरजांनुसार करीत. कोरोनाच्या तीन वर्षांच्या काळात 'मनरेगा'ने ग्रामीण भागातील जनतेला रोजगार पुरवून जीवदान दिलेच; परंतु क्रयशक्ती निर्माण करून अर्थव्यवस्थेला गती प्राप्त करून दिली. प्रतिवर्षी पाच ते सहा कोटी कुटुंबांना रोजगार दिला जात असे. 2023-2024 मध्ये तर एकूण 8 कोटी 32 लाख, तर 2025 मध्ये 12 कोटी 16 लाख लोकांना रोजगार मिळाला.यावरून 'मनरेगा'ची व्याप्ती व यश ध्यानात येते. शेवटी सामाजिक उद्दिष्टाचा विचार केला, तर 'मनरेगा'वर काम करणाऱ्यांपैकी सुमारे 60 टक्के कामगार हे अनुसूचित जाती व जमातीचे असून त्यापैकी 50 टक्के स्त्रिया असत. सुरुवातीला योजनेचे नाव 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' असे होते; परंतु राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची 'अंत्योदय' ही संकल्पना ध्यानात घेऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कायदा करताना तिचे नामकरण 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा' असे केले. 'मनरेगा'च्या जागी सरकारने आणलेली 'विकसित भारत रोजगार हक्क आणि आजीविका अभियान (ग्रामीण) (यापुढे 'जी राम जी') हिच्यातील तरतुदी पाहता ते 'मनरेगा'चे नुसते नामकरण नाही. योजनेच्या नावातून गांधीजींचे नाव जाणीवपूर्वक वगळले, हे तर अक्षम्य आहे; पण नवीन कायदा म्हणजे 'मनरेगा' बंद पाडण्याची सुरुवात आहे. 'मनरेगा'वर घाव घालणारी तरतूद म्हणजे 'जी राम जी' केंद्रीय योजना नसून ती 'केंद्र पुरस्कारित' योजना केली आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणे केंद्र सरकार 100 टक्के खर्च करणार नसून केंद्र 60 टक्के आणि राज्ये 40 टक्के या प्रमाणात खर्च करतील आणि साधनसामग्रीवरील खर्च 75 व 25 टक्के असेल. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार अनेक राज्ये कर्जाच्या बोजाखाली दबली आहेत. महाराष्ट्रावरील कर्ज साडेनऊ लाख कोटी रुपयांच्या घरात गेले आहे. अशा स्थितीत काही राज्ये 40 टक्के खर्च करू शकली नाहीत, तर 'जी राम जी'वर प्रतिकूल परिणाम होऊन अशा राज्यांतील गरिबांचा रोजगार कमी होईल. रोजगार देता आला नाही, तर बेरोजगार भत्ता देण्याची जबाबदारीसुद्धा राज्य सरकारांची आहे. केंद्र सरकार प्रत्येक राज्याला 'जी राम जी'साठी ठरावीक निधीचे वाटप करणार असून त्याचे निकष अजून ठरवले गेले नसून ते (म्हणे) 'नीती आयोग' ठरवणार आहे. त्याबाबत राज्य सरकारबरोबर कसलीच चर्चा नाही. हे संघराज्याला मारक आहे. 'नीती' आयोगाचे निकष मान्य नसल्यास राज्यात योजना बारगळेल व त्याला राज्य सरकारे जबाबदार धरली जातील. शेतीसाठी कामगार मिळावेत म्हणून पेरणी व हंगामाच्या वेळी, दोन महिने 'जी राम जी' बंद ठेवण्यात येणार आहे. 'मनरेगा' सुरू केली, तेव्हासुद्धा शेती कामासाठी कामगार मिळावेत म्हणून ती तीन महिने बंद ठेवावी अशी मागणी राज्यांनी केली होती; परंतु ती सरकारने मान्य केली नाही. आता दोन महिने 'जी राम जी' अधिकृतपणे बंद राहणार असल्यामुळे रोहयोवर अवलंबून असलेल्या सुमारे पाच ते सहा कोटी कुटुंबांना मोठ्या शेतकऱ्यांच्या-जमीनदारांच्या शेतावर किंवा बिगरशेती कामांवर मिळेल त्या वेतनावर काम करावे लागेल. खरे म्हणजे, 12 महिने ही योजना सुरू राहिली, तरी शेतीसाठी कामगारांचा 'तुटवडा' भासेल अशी परिस्थिती नाही. कारण, केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील काम करू इच्छिणाऱ्या श्रमिक महिलांचे प्रमाण 2017-18 मध्ये जे 26 टक्के होते, ते प्रतिवर्षी वाढत जाऊन 2023-24 मध्ये 47 टक्क्यांवर पोहोचले आहे. 'मनरेगा' महिला धार्जिनी असून त्यांचे काही प्रमाणात 'आर्थिक सबलीकरण' झाले आहे. रोजगार हमी योजनेमुळे शेतीवर काम करणाऱ्या मजुरांची मजुरी वाढते हे धादांत खोटे आहे. 2015-16 ते 2024-25 या दहा वर्षांतील सरकारी आकडेवारी पाहिली, तर असे दिसते की, एकूण ग्रामीण भागातील (म्हणजे शेती व बिगरशेतीवरील) व निव्वळ शेतीवरील मजुरीच्या वार्षिक वाढीचे दर सारखेच असून ते प्रतिवर्षी होणाऱ्या महागाईच्या दराइतकेच किंबहुना काही वर्षी कमी आहेत.

# 692 कोटी रुपयांच्या प्रारुप आराखड्यास मंजुरी

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 साठी सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजना तीनही योजनांकरिता 692.74 कोटी रुपयांच्या प्रारुप आराखड्यास आज जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. या बैठकीला राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना.प्रा.डॉ. अशोक वुईके, उद्योग राज्यमंत्री ना. इंद्रनिल नाईक, आ. राजू तोडसाम, आ. बाळासाहेब मांगुळकर, आ. संजय देरकर, आ. किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, सहाय्य जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अमीत रंजन, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या वार्षिक आराखड्यानुसार जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करिता 471.58 कोटी रुपये, आदिवासी उपयोजना करिता 137.16 कोटी रुपये तर अनुसूचित जाती उपयोजना करिता 84 कोटी रुपये अशा तीनही योजनांकरिता प्रारुप आराखडा तयार करण्यात आला असून आजच्या या बैठकीमध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता, त्यास समितीने मान्यता दिली आहे. या आराखडयास राज्य समितीची मान्यता मिळण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचेही पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

गतवर्षी 754.38 कोटींची तरतूद, 77.18 टक्के खर्च ; निधी शंभर टक्के खर्च करा

### शेतकरी हा शासन - प्रशासनाचा केंद्रबिंदू

**■ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य शासनासह जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध योजना, नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. शेतकरी हा शासन-प्रशासनाचा केंद्रबिंदू आहे. त्यांच्यासाठी जिल्ह्यात दिर्घकालीन उपाययोजना राबवित आहोत. शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखे कठोर पाउल उचलू नये, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी आश्वस्त केले.**

गतवर्षीच्या खर्चाचा आढावा घेतल्यानंतर पालकमंत्री ना. राठोड म्हणाले की, सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजना यांसाठी एकूण 754.38 कोटी रुपयांची तरतूद मंजूर करण्यात आली आहे. यापैकी आज रोजीपर्यंत 538.45 कोटी रुपयांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून 277.86 कोटी रुपयांची निधी वितरण करण्यात आला आहे. कार्यन्वयीन यंत्रणेमार्फत आतापर्यंत 214.46 कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला असून वितरित निधीच्या तुलनेत खर्चाची टक्केवारी 77.18 टक्के इतकी आहे. निधी शंभर टक्के खर्च करण्याच्या सूचना देत खर्च न झालेल्या निधीच्या पुनर्नियोजन आराखड्यासही या बैठकीत मान्यता देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

योजनानिहाय तपशील पाहता, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत 528 कोटी रुपयांची तरतूद असून त्यापैकी 386.76 कोटी रुपयांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेतून 196.70 कोटी रुपयांचे वितरण झाले असून 149.92 कोटी रुपयांचा प्रत्यक्ष खर्च करण्यात आला आहे. आदिवासी उपयोजना अंतर्गत 142.38 कोटी रुपयांची तरतूद असून 89.44 कोटी रुपयांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यामधून 47.13 कोटी रुपयांचे वितरण होऊन 31.39 कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. तसेच अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत 84 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून 62.92 कोटी रुपयांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेतून 34.04 कोटी रुपयांचे वितरण झाले असून 33.15 कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. जिल्हा प्रशासनाकडून निधीचा अधिकाधिक प्रभावी वापर करून उर्वरित कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांना गती देण्याच्या सूचना पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच जिल्हा नियोजन समितीचा सर्व निधी शंभर टक्के खर्च केला जात आहे. अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनांसाठीचा निधी इतरत्र वळवता येत नाही. हा निधी जिल्हा नियोजन समितीच्या ठरलेल्या आराखड्यानुसार खर्च केला जातो, असेही पालकमंत्र्यानी यावेळी स्पष्ट केले.

या बैठकीची प्रस्तावना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केली तर आभार जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांनी मानले.

# भारत जगासाठी आशेचा किरण

## देशाची जगातील तिस-या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल



**विदर्भ केसरी।नवी दिल्ली :**

लोकसभेत मोदींच्या भाषणाविनाच राष्ट्रपतींच्या अभिभाषणाचा धन्यवाद प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या आभार प्रस्तावावर भाषण केले. यावेळी त्यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच भारताची वाटचाल विकासाच्या दिशेने जोरात सुरू असल्याचे सांगत राष्ट्रपतीच्या अभिभाषणातून भारताच्या विकासाचा स्वर संसदेत घुमला, असे मोदी म्हणाले. २१ व्या शतकाची पहिली तिमाही पूर्ण झाली आहे. आता दुसरी तिमाही विकसित भारताच्या जडणघडणीत महत्त्वाची असणार आहे, असे सांगतानाच भारत जगाला आशेचा किरण दाखविणारा देश बनला आहे, असे मोदी म्हणाले.

भारत देश जागतिक स्थरावर जी आव्हाने निर्माण झाली आहेत, त्यावर समाधान शोधणारा आणि जगाला आशेचा किरण दाखवणारा देश बनला आहे. भारताचा जीडीपी प्रचंड वाढला आहे, यावरून आपली अर्थव्यवस्था किती मजबूत झाली, याचा अंदाज येतो. आपण ज्या गतीने पुढे जात आहोत, ते पाहता लवकरच आपण जगात तिस-या नंबरची अर्थव्यवस्था होऊ, असा विश्वासही यावेळी मोदी यांनी व्यक्त केला. विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रात भारताची दमदार वाटचाल सुरू आहे, असे मोदी म्हणाले. यावेळी मोदी यांनी काँग्रेस पक्ष आणि नेत्यांवर जोरदार टीका केली. या टीकेला काँग्रेसनेही प्रत्युत्तर दिले.

### जगातील ९ मोठ्या देशांसोबत ट्रेड डील

**■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज हे जग हे आज नव्या ग्लोबल ऑर्डरच्या दिशेने वाटचाल करत आहे. दुस-या महायुद्धानंतर एक वर्ल्ड ऑर्डर बनले होते. त्यानंतर आता नव्याने वर्ल्ड ऑर्डर बनले आहे, त्याचा कल हा भारताच्या बाजूने आहे. एक जागतिक मित्र म्हणून आता भारत अनेक देशांचा व्यापारामध्ये एक विश्वासू पार्टनर बनला आहे. गेल्या काही दिवसांत जगातील प्रमुख ९ देशांसोबत भारताने ट्रेड डील केला. यामध्ये मदर ऑफ ऑल डीलचा समावेश आहे.**

### राहुल गांधींचा मोदींवर पलटवार

**■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्यसभेतील भाषण संपल्यानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक पोस्ट करीत मोदीजी सत्यामुळे इतके घाबरले की, लगेचच ते असत्याच्या आश्रयाला गेले. असो, जे योग्य वाटेल, तेच केले, असे म्हणत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली.**



# फरार आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

गंभीर गुन्ह्यात 'वॉंटेड' असलेला कुख्यात आरोपी पोलिसांच्या जाळ्यात अडकला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला मोठ्या शिताफीने भोसा परिसरातून ताब्यात घेतले. ही कारवाई २ फेब्रुवारीला सायंकाळच्या सुमारास करण्यात आली.

रिजवान उर्फ जुम्मा पिरसाब शाह () रा. वसिम लेआउट भोसा, यवतमाळ असे पोलिसांनी बेड्या ठोकलेल्या या आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर येथील अवधूतवाडी पोलिस ठाण्यात विविध गंभीर गुन्हे दाखल असले तरी तो अनेक दिवसांपासून फरार होता. पोलिस दफ्तरी 'वॉंटेड' म्हणून त्याची नोंद आहे. मात्र २ फेब्रुवारीला हा आरोपी भोसा परिसरातील भवानी चौकात उभा आहे, अशी खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी लगेच भवानी चौक गाठून रिजवानला ताब्यात घेतले. यावेळी आधार कार्डवरुन हवा असलेला हाच आरोपी आहे का, याची पोलिसांनी खात्री करुन घेतली. रिजवाननेही त्याच्या शिरावर असलेले गुन्हे आपणच केले, अशी पोलिसांपुढे कबुली दिली. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करुन पुढील कारवाईसाठी अवधूतवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चावरे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक मनीष गावंडे, उपनिरीक्षक गजानन राजमल्लू, सै. साजीद, प्रशांत हेडावू, रुपेश पाली, योगेश डगवार, सुनील पैठणे, देवा होले, आकाश सूर्यवंशी यांच्या पथकाने पार पाडली.

# गळफास घेत वृद्धाची आत्महत्या

**विदर्भ केसरी। पांढरकवडा :**

80 वर्षीय वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पांढरकवडा पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सदाशिव हिरालाल प्रजापती वय 80 वर्षे असे मृत व्यक्तीचे नाव असून ते पिपरी रोड, केळापुर येथे वास्तव्यास होते. याबाबत त्यांचा मुलगा दिपक सदाशिव प्रजापती वय 27 वर्षे यांनी पोलिसांत जबानी दिली. दि. 4 फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारे 6 वाजण्याच्या दरम्यान ही घटना उघडकीस आली. दिपक प्रजापती व त्यांची आई काही वेळ घराबाहेर जाऊन परत आले असता घराचे दार आतून बंद असल्याचे आढळले. दरवाज्यातून आत डोकावून पाहिले असता सदाशिव प्रजापती यांनी घरातील लाकडी फळ्याला दोरी बांधून गळफास घेतल्याचे दिसले. गावकऱ्यांच्या मदतीने दरवाजा उघडून त्यांना खाली उतरवण्यात आले; मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालय, पांढरकवडा येथे पाठवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# RCBचा ऐतिहासिक 'विराट' विजय; दिल्लीला धूळ चारत WPL ट्रॉफीवर दुस-यांदा नाव कोरले

**विदर्भ केसरी।**




'ई साला कप नाम्दे!' ही घोषणा पुन्हा सत्यात उतरली आहे. महिला प्रीमियर लीगच्या (WPL) थरारक अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB) संघाने दिल्ली कॅपिटल्सचा ६ गडी राखून पराभव करत दुस-यांदा जेतेपदावर आपले नाव कोरले. कर्णधार स्मृती मानधना आणि जॉर्जिया व्हॉल यांची धडाकेबाज अर्धशतकी खेळी आरसीबीच्या ऐतिहासिक विजयाच्या शिल्पकार ठरल्या.

विजयासाठी दिलेल्या २०३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात खराब झाली होती. ग्रेस हॅरिस अवघ्या ९ धावांवर बाद झाली. मात्र, त्यानंतर कर्णधार स्मृती मंधाना आणि जॉर्जिया व्हॉल या जोडीने दिल्लीच्या गोलंदाजांची पिसं काढली.

स्मृती मंधाना: ४१ चेंडूत ८७ धावा (१२ चौकार, ३ षटकार) जॉर्जिया व्हॉल: ५४ चेंडूत ७९ धावा (१४ चौकार)

या दोन्ही फलंदाजांनी दुसऱ्या विकेटसाठी १६५ धावांची विक्रमी भागीदारी रचली, जी WPL इतिहासातील कोणत्याही विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी ठरली आहे. या भागीदारीने दिल्लीला सामन्यातून पूर्णपणे बाहेर फेकले. सामना संपत आला असताना जॉर्जिया व्हॉल (७९), रिचा घोष (६) आणि स्मृती मंधाना (८७) पाठोपाठ बाद झाल्याने थोडी धाकधूक वाढली होती. मात्र, नॅडिन डी क्लर्क आणि राधा यादव यांनी डोकं शांत ठेवून आरसीबीला विजयाचा गुलाल उधळायला लावला. राधा यादवने ५ चेंडूत १२ धावा कुटून १९.४ षटकातच विजयावर शिक्कामोर्तब केले.

दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना दमदार धावसंख्या उभारली होती, मात्र आरसीबीच्या आक्रमणापुढे त्यांची गोलंदाजी निष्प्रभ ठरली. चिनेल हेन्रीने २ बळी घेतले, पण ती संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. दिल्लीचा हा सलग चौथा अंतिम फेरीतील पराभव ठरला.

# १,१६४ शाळांत मुलींसाठी प्रसाधनगृहेच नाहीत

**विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेचे धक्कादायक वास्तव समोर आले असून, तब्बल १,१६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय नसल्याचे उघडकीस आले आहे. तर ३,३२८ शाळांमध्ये अद्याप वीज सुविधा उपलब्ध नसल्याचे भीषण वास्तव शिक्षण विभागाच्या २०२४ ते २०२६ या कालावधीतील सांख्यिकी अहवालातून उजेडात आले आहे. मुंबई, गोंदिया, कोल्हापूर, सातारा आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये मात्र मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची शंभर टक्के सुविधा आहे.

या अहवालामुळे राज्यातील शाळांमधील मूलभूत सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या शाळांमध्ये १,०४३ शासकीय, ६४ खासगी अनुदानित, २० खासगी विनाअनुदानित आणि ३७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वर्ष २०२४ ते २०२६ या दोन वर्षांतील शिक्षण विभागाचा सांख्यिकी अहवाल २९ जानेवारीला शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सादर केला गेला.

मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या सर्वाधिक ११२ शाळा बीड जिल्ह्यात आहेत. हिंगोली, नांदेड, परभणी, गडचिरोली, जळगाव, अमरावती, नाशिक आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ५० ते १०० शाळांमध्ये ही सुविधा नाही. तर २० जिल्ह्यांमध्ये ५० पेक्षा कमी शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसल्याचे अहवालात म्हटले आहे.

वीज नसलेल्या ३,३२८ शाळांमध्ये ३,१०२ शासकीय, १३१ खासगी अनुदानित, १९ विनाअनुदानित आणि ७६ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वीज नसलेल्या शाळांचा तपशील : नंदुरबार- ४५५, गडचिरोली- ४३१, बीड- ३८६, नांदेड- २२९, परभणी- २००, हिंगोली- १७४, धुळे -१६३, नाशिक- १६३, संभाजीनगर- १५७, लातूर- १३६, जालना- ११८.

### मुलींच्या शिक्षणावर परिणाम

**■ मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसणे ही केवळ सोयीची नव्हे तर मुलींच्या शिक्षणावर थेट परिणाम करणारी बाब मानली जाते. किशोरवयीन मुलींसाठी सुरक्षित व स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा नसल्याने शाळा गळतीचे प्रमाण वाढण्याची शक्यता शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.**

### राज्यातील 'हँडवॉश'ची सुविधा नसलेल्या शाळा

**■ राज्यातील २,४२८ शाळांमध्ये हँडवॉश दिले जात नाही. अशा शाळांमध्ये १,५८७ शासकीय, ४५८ खासगी अनुदानित, ५६ विनाअनुदानित आणि ३२७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. यामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

आमच्या उच्चस्तरीय बैठकीत शाळांमधील सुविधांच्या कमतरतेबाबतचा अहवाल सादर झाला. येत्या एक महिन्यात संबंधित शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची व्यवस्था केली जाईल, असे शिक्षण विभागाने या विषयी म्हटले आहे.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,
Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## किरकोळ कारणातून काठीने मारहाण

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

राजूरकरच्या शेतातील तुरी कशाला काढल्या असे म्हणत एका इसमाला बापलेकांनी काठीने मारहाण केली. ही घटना राळेगाव तालुक्यातील पिंपरी (सावित्री) येथे ४ फेब्रुवारीला घडली. या प्रकरणी प्रमोद विजयराव बोडेकर (३१) रा. पिंपरी (सावित्री) यांनी वडकी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून अविनाश तात्याजी बलकी (४०) आणि तात्याजी मारोती बलकी (६५) दोघेही रा. पिंपरी (सावित्री) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला.

# जि.प.वर काँग्रेस चा झेंडा फडकवणार

## माजी मंत्री शिवाजीराव मोघे साहेब यांचे आवाहन : बैठकीत प्रचाराचा श्रीगणेशा

**▸विदर्भ केसरी। घाटंजी / प्रतिनिधी अरविंद चौधरी**



घाटंजी तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे वारे वाहू लागले असून, या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने घाटंजी तालुक्यात आपली संपूर्ण शक्ती पणाला लावली आहे. घाटंजी आणि आर्णी नगर परिषदेत काँग्रेस पक्षाने आपले नगराध्यक्ष बसवून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केल्यानंतर, आता पक्षाने आपला मोर्चा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीकडे वळवला आहे. याच अनुषंगाने राज्याचे माजी मंत्री ॲड. शिवाजीराव मोघे व युवा नेते जितेंद्र मोघे यांच्या नेतृत्वामध्ये ग्रामीण भागात जोरदार मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे.

या रणनीतीचा भाग म्हणून घाटंजी तालुक्यातील पारवा जी प सर्कल मधून तरोडा आणि पारवा पाठोपाठ पार्डी जिल्हा परिषद गटासाठी घोटी येथेही काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक अत्यंत उत्साहात संपन्न झाली. तरोडा येथील श्री जगदंबा माता देवस्थानच्या पवित्र परिसरात झालेल्या बैठकीने प्रचाराचा श्रीगणेशा केला, तर पारवा आणि घोटी येथील बैठकांमधून माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी कार्यकर्त्यांना विजयाचा नवा आत्मविश्वास दिला. आपल्या प्रदीर्घ राजकीय अनुभवाच्या शिदोरीतून मोघेंनी कार्यकर्त्यांना निवडणुकीच्या रणांगणात उतरण्यासाठी आवश्यक असलेले सूक्ष्म नियोजन आणि रणनीती समजावून सांगितली. या आढावा बैठकांमुळे तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये एक नवी ऊर्जा संचारली असून आगामी निवडणुकांसाठी विजयाचा नवा आराखडा तयार करण्यात आला आहे. या बैठकांना जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस जितेंद्रभाऊ मोघे, तालुकाध्यक्ष रुपेश कल्यामवार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष माणिकराव मेश्राम, माजी जिल्हा परिषद सदस्य स्वामीबाबू काटपेल्लीवार आणि माजी समन्वय समिती अध्यक्ष इकलाख खान यांची प्रमुख उपस्थिती होती.या महत्त्वपूर्ण बैठकांना ॲड. विजयभाऊ भुरे, प्रकाश आत्राम, सहदेव राठोड,अरविंद चौधरी,, भारत वाडगुरे, दशरथ मोहूर्ले, गजानन चौधरी, आकाश आत्राम, अमृत पेंदोर, गणेश मुद्दलवार, गजाननभाऊ गाउत्रे, लिंगाजी मडावी, सिनु किनाके, भीमराव कुडमेथे, विठ्ठल मेश्राम, बेलोदे पाटील, उईकेजी, कांबळे (सावरगाव), श्रीनिवास बग्गीवार, राजु नैरुद्रावार, करुणाकर लिहितकार गजानन चिल्लावार, मोहन बग्गीवार, सतिष रेड्डी, प्रेम रेड्डी, राहुल आत्राम, अक्षय पवार, विजय देवतळे, सुनिल हुड, वसंत कडू, महेश आंबेवार, राम वाजपेयी, प्रजय कडू, राजेश निकोडे, बाबाजी गणेश वलबवार पोटपेल्लीवार, गोवर्धन रेड्डी, गजानन चिल्लावार जयतुजी मेश्राम, देवराव राठोड, बौउद्दीन काजी, शुभांगी पुसनाके सरपंच घोटी, अनिताताई धुर्वे नामदेवराव भोयर, अशोक जिलरवार, बळीराम उईके, राजुभाऊ हिवणे, बाबुभाई शेख, निलेश कडू, पुंजाजी आत्राम, संजय कोल्हे, गणेश वलपवार, दिपक भवरे, नारायण, कैलाश जाधव,ठाकरे, पुंडलिक बिबेकर आणि प्रेम वेट्टी यांसह असंख्य निष्ठावान पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकींच्या माध्यमातून काँग्रेसने निवडणुकीचे रणशिंग फुंकले असून, आगामी काळात पक्ष पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट संकेत यातून मिळाले आहेत.

### सर्वांगिण विकासासाठी काँग्रेस कटिबध्द

■ यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना नेत्यांनी सांगितले की, निवडणुकांच्या तोंडावर प्रत्येक कार्यकर्त्याने जनसंपर्क वाढवून पक्षाची ध्येयधोरणे घराघरांत पोहोचवणे आवश्यक आहे. बैठकीत प्रामुख्याने पार्डी गटासह संपूर्ण तालुक्यातील उमेदवारी, प्रचाराचे नियोजन आणि बूथ स्तरावरील संघटनात्मक बांधणी यावर सविस्तर खल करण्यात आला. घाटंजी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व काँग्रेसजन कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी नेत्यांनी केला.

## महत्त्वाचे

### यवतमाळात भव्य जैन बिझनेस कार्निवल – उद्योजकतेला नवी दिशा देणारा चार दिवसीय महोत्सव

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ | प्रतिनिधी**

उद्योजकता, नवकल्पना आणि व्यापाराच्या नव्या संधींचा संगम साधणारा भव्य जैन बिझनेस कार्निवल यवतमाळ शहरात 6 ते 9 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. समता मैदान, यवतमाळ येथे होणाऱ्या या चार दिवसीय कार्निवलचे आयोजन जोश फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले असून, स्थानिक ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योजक, व्यापारी, स्टार्टअप्स आणि नवोदित व्यावसायिकांसाठी हे एक प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे.

या बिझनेस कार्निवलमध्ये विविध उद्योग क्षेत्रांतील आकर्षक स्टॉल्स, उत्पादन व सेवांचे सादरीकरण, नेटवर्किंग सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच व्यवसायवाढीसाठी उपयुक्त माहिती व संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन, स्थानिक व्यवसायांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि उद्योजकांमध्ये परस्पर सहकार्य वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

व्यवसायासोबतच मनोरंजनालाही विशेष स्थान देण्यात आले असून, लाईव्ह ऑर्केस्ट्रा, लहान मुलांसाठी खेळणी, विविध प्रकारचे रुचकर खाद्यपदार्थ आणि नव्या संकल्पनांसाठी उत्कृष्ट मंच या कार्निवलची खास वैशिष्ट्ये ठरणार आहेत. याशिवाय अनेक मान्यवर, कलाकार व विशेष पाहुणे उपस्थित राहून सहभागींचे मार्गदर्शन करणार आहेत.

या अनोख्या उपक्रमात उद्योजक, व्यापारी, विद्यार्थी तसेच व्यवसायात रस असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक जैन फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सीईओ मंदार पत्की यांची लोही ग्रामपंचायतीला भेट



**▸विदर्भ केसरी। दारव्हा | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्राम समृद्धी पंचायत अभियानाच्या पार्श्वभूमीवर दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मंदार पत्की यांनी दारव्हा तालुक्यातील लोही ग्रामपंचायतीला भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा घेत गावातील घरकुल लाभार्थी निळकंठ कदम, मोहन वाघ आणि सुभाष वाघ यांच्या घरकुलांचे भूमिपूजन केले. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देत मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियानाबाबत सविस्तर माहिती घेतली. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही मदत आवश्यक असल्यास मागणी करावी, असे त्यांनी यावेळी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी पत्की यांनी ग्रामपंचायतीच्या विविध कामकाजाची पाहणी करून समाधान व्यक्त केले आणि कामकाज चांगल्या पद्धतीने सुरू असल्याचे नमूद केले. यावेळी लोही ग्रामपंचायतीचे सरपंच संजयभाऊ शिंदे यांनी श्री. पत्की यांचे स्वागत केले, तर पंचायत समिती दारव्हा येथील गटविकास अधिकारी राजीव शिंदे यांचे स्वागत उपसरपंच राजूभाऊ हळदे यांनी केले. विस्तार अधिकारी श्री. फुटाणे यांचे स्वागत तुकारामजी बिजवे यांनी केले. कार्यक्रमास श्री. विद्याधर चौधरी, गिरी साहेब, कोल्हे साहेब, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी, आशा सेविका तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

### कुऱ्हाड फाट्यावर पकडली रेतीचोरी

यवतमाळ : रेतीची चोरी करून नेताना आर्णी पोलिसांनी दोघांना पकडले. ही कारवाई ३ फेब्रुवारीला सायंकाळी आर्णी तालुक्यातील कुऱ्हाड फाटा येथे करण्यात आली. या प्रकरणी पोलिस कर्मचारी योगेश गिरी यांच्या फिर्यादीवरून मुंतजी चांदखा खान (४३) रा. राणीधानोरा आणि सोनू राऊत (३६) रा. आंबोडा ता. आर्णी या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून रेतीचोरीसाठी वापरलेले वाहन (एमएच २९ टी १२४५) आणि तीन ब्रास रेती असा एकंदर ५ लाख १८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### वृद्धाचे ४० हजार रूपये उडविले

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

: किराणा दुकानात गेलेल्या एका ७३ वर्षीय वृद्धाचे नगदी ४० हजार रूपये अज्ञात चोरट्याने लंपास केले. ही घटना ३ फेब्रुवारीला गांधी चौकातील स्वराज किराणा दुकानात घडली. दलसिंग जालम चव्हाण (७३) रा. सिंगद ता. दिग्रस हे दुकानात गेले होते. त्यांनी एका नायालॉनच्या थैलीत ठेवलेले नगदी ४० हजार रूपये चोरट्याने चोरून नेले. या प्रकरणी दलिसंग चव्हाण यांनी पुसद शहर पोलिसात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## एस.टी. प्रशासनाचा मनमानी कारभार

**▸विदर्भ केसरी। ढाणकी प्रतिनिधी मिलिंद चिकाटे**

राज्य परिवहन महामंडळाच्या किनवट आगाराचा नियोजनशून्य कारभार सध्या प्रवाशांच्या मुळावर उठला आहे. गेल्या चार दिवसांपासून दुपारी १ वाजताची किनवट-उमरखेड ही नियोजित बसफेरी कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द केली जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ही बस या मार्गावरील शेवटची फेरी असल्याने आदिवासी व दुर्गम भागातील प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर बसचे अधिकृत शेड्युल हे किनवट-ढाणकी -गांजेगाव-हिमायतनगर असे आहे. मात्र, आगार व्यवस्थापनाकडून या नियोजित मार्गाला बगल देऊन बस परस्पर आप्पारापेठ मार्गे वळवली जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. यामुळे मूळ मार्गावरील गावांमधील प्रवाशांना तासनतास ताटकळत राहावे लागत आहे.

उमरखेडवरून किनवटला परतणारी ही शेवटची बस असल्याने शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठी कोंडी होत आहे. पासधारक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, सायंकाळी उशिरा पर्यंत बस उपलब्ध नसल्याने विशेषतः विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आगार व्यवस्थापक जाणीवपूर्वक ही फेरी रद्द करून खासगी वाहतुकीला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप ही नागरिक करत आहेत. या संदर्भात विभाग नियंत्रक (नांदेड) आणि महाव्यवस्थापक (मुंबई) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून, दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. बस सेवा तात्काळ पूर्ववत न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त प्रवाशांनी व स्थानिक संघटनांनी दिला आहे.

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा :**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांना पांढरकवडा शहरात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी शहरातील विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दि.०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता स्थानिक बचत भवन येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपस्थितांनी मौन पाळून सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली.

स्पष्ट वक्तृत्व, निर्भीड नेतृत्व आणि विकासाभिमुख विचारधारा यामुळे अजितदादा पवार यांचे महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळे स्थान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या श्रद्धांजली सभेस विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पांढरकवडा शहराचे माजी नगराध्यक्ष शंकर बडे. खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ नेते मदन जिद्देवार. कॉंग्रेस कमिटीचे माजी तालुकाध्यक्ष अमर पाटील चालबर्डीकर. शहर अध्यक्ष मनोज भोयर. शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख राकेश नेमणवार व्यापारी असोसिएशन अध्यक्ष गोपाल बाजोरिया. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शिवारेड्डी येल्टीवार. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बिशनसिंग शिंदो. काँग्रेसचे जेष्ठ नेते विजय पाटील. प्रगतिशील शेतकरी रामकृष्ण पाटील. राष्ट्रवादी (शरद पवार गट) माजी पंचायत समितीचे सदस्य व उपसरपंच तथा तालुकाध्यक्ष विजय तेलंग. वकील संघाचे अनिल किनाके. अजय कोठेवार. कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संजय नाईनवार अल्पसंख्याक समाजाचे माजी मुख्याध्यापक काजी सर, हाफिज पोसवाल, इकराम अली.मेडिकल असोसिएशनच्या सचिव अमित गावंडे, संजय शर्मा, विजय खापर्डे, शंकर अंधारे, रमेश उंबरकर, अमित वाश्रीकर, जेष्ठ नेते उदे सर सह आदी सामाजिक कार्यकर्ते व सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन सोनू उर्फ स्वप्निल उप्पलवार तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे व नगर सेवकांनी केले असून कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी दादांना विनम्र अभिवादन करत त्यांच्या कार्यकर्तृत्वास उजाळा दिला.

## काळी दौ. येथे मिळणार राष्ट्रीयीकृत बँक

### खा. संजय देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील काळी दौ. येथे राष्ट्रीयीकृत बँकेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खासदार संजय देशमुख यांनी केलेल्या प्रयत्नांना यश येण्याची चिन्हे दिसत आहेत. या संदर्भात खासदार संजय देशमुख यांनी आज नवी दिल्ली येथे माननीय केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमन यांची भेट घेऊन काळी दौ. येथे बँक शाखा सुरू करण्याची मागणी केली.

यावेळी खासदार देशमुख यांनी काळी दौ. गावाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, या गावाची लोकसंख्या २ हजारांपेक्षा अधिक असून परिसरातील १५ ते २० लहान-मोठी खेडी या गावाशी थेट जोडलेली आहेत. शेती, व्यापार, शासकीय योजना तसेच दैनंदिन आर्थिक व्यवहारांचे हे प्रमुख केंद्र आहे. मात्र, इतक्या महत्त्वाच्या गावात आजतागायत कोणतीही राष्ट्रीयीकृत बँक शाखा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सध्या या भागातील नागरिकांना साई इजारा (ता. महागाव) येथील बँक शाखेवर अवलंबून राहावे लागत असून, साई इजारा हे लोकसंख्या व बाजारपेठेच्या दृष्टीने काळी दौ. पेक्षा लहान गाव आहे. त्यामुळे साई इजारा येथील युनियन बँक ऑफ इंडियाची शाखा काळी दौ. येथे स्थलांतरित करावी किंवा काळी दौ. येथे स्वतंत्र नवीन बँक शाखा मंजूर करावी, अशी मागणी खासदार संजय देशमुख यांनी विशेष प्रकरण (Special Case) म्हणून मांडली. या मागणीची दखल घेत माननीय केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमन यांनी काळी दौ. येथे नवीन बँक शाखा मंजूर करण्याबाबत किंवा साई इजारा येथील बँक शाखा काळी दौ. येथे स्थलांतरित करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. काळी दौ. येथे बँक शाखा सुरू झाल्यास परिसरातील शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, महिला बचत गट तसेच सर्वसामान्य नागरिकांना बँकिंग सुविधा सुलभ होणार असून, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होणार आहे, असे मत खासदार संजय देशमुख यांनी व्यक्त केले.

## विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त वातावरणात निर्भयपणे परीक्षा द्यावी : मोहम्मद मुसद्दीक, केंद्र संचालक

**▸विदर्भ केसरी। पुसद**



इयत्ता १० वी व १२ वीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांना सुरुवात होत असून विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त, शांत व सुरक्षित वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी शिक्षण विभागाकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणाऱ्या या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे.

परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार टाळण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून प्रत्येक केंद्रावर CCTV यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच परीक्षा केंद्रांच्या परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले असून अनावश्यक गर्दीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. परीक्षा प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व विश्वासार्ह पार पाडण्यासाठी शिक्षण विभाग, महसूल विभाग व पोलीस प्रशासन यांच्यात योग्य समन्वय साधण्यात आला आहे. यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक तसेच पर्यवेक्षक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा काळात कॉपीमुक्त वातावरण राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या असून विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा मानसिक ताण येऊ नये, याची विशेष काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत.

यावेळी केंद्र संचालक मोहम्मद मुसद्दीक यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, त्यांनी कोणत्याही गैरप्रकारांचा अवलंब न करता नियमांचे पालन करून शांत, निर्भय व आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी.

# रुग्णांच्या वेदना झाकण्यासाठी बनावट अहवाल ?

## गुरुदेवची अधिष्ठात्यांवर कारवाईची मागणी : शासकीय रुग्णालय समस्यांचे माहेरघर; गुरुदेव युवा संघाचा थेट हल्ला

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ :**



श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील गंभीर समस्या झाकण्यासाठी अधिष्ठात्यांनी जाणीवपूर्वक चुकीचा व खोटा अहवाल सादर केल्याचा गंभीर आरोप गुरुदेव युवा संघाने केला आहे. या प्रकरणी संबंधित अधिष्ठात्यांवर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करावी, अशी ठोस मागणी संघाच्या वतीने मुख्यमंत्री सचिवालय, वैद्यकीय मंत्री व संबंधित वरिष्ठ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

गुरुदेव युवा संघाच्या म्हणण्यानुसार, रुग्णालयातील अस्वच्छता, स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था, रक्तपेढीमधून गोरगरीब रुग्णांना रक्त देण्यास टाळाटाळ, कर्मचाऱ्यांची उर्मट वागणूक, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर व यूआयडी केंद्राचा अभाव, २४ तास औषधांची अनुपलब्धता, पिण्याच्या पाण्याची गैरसोय तसेच किरकोळ भांडारात लाखो रुपयांचा कथित भ्रष्टाचार या समस्या वारंवार निदर्शनास आणूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. या गंभीर तक्रारींची दखल घेत वैद्यकीय मंत्री यांनी अधिष्ठात्यांना चौकशीचे आदेश देणारे पत्र पाठवले होते. मात्र प्रत्यक्ष चौकशी न करता केवळ कागदावर समिती गठीत करून खोटा व दिशाभूल करणारा अहवाल संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन (DMER) यांच्याकडे पाठवण्यात आल्याचा आरोप गुरुदेव युवा संघाने केला आहे. त्यामुळे शासनाला प्रत्यक्ष परिस्थितीपासून अनभिज्ञ ठेवून रुग्णांच्या यातना लपवण्यात आल्या, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यवतमाळ शासकीय रुग्णालयात रुग्णांना औषधे वेळेवर मिळत नाहीत, स्ट्रेचरची कमतरता आहे, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवासाची कोणतीही व्यवस्था नाही. थंडीच्या दिवसांत नातेवाईकांना उघड्यावर राहावे लागत असल्याची विदारक परिस्थिती असून दिव्यांग रुग्णांसाठी यूआयडी केंद्र रुग्णालयातच सुरू करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

तसेच रुग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा उभारण्याचीही आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकरणी गुरुदेव युवा संघाने स्पष्ट भूमिका घेतली असून, खोटा अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खातेनिहाय चौकशी, निलंबन, फौजदारी कारवाई तसेच दोषी आढळल्यास शिक्षेची मागणी करण्यात आली आहे. गरज पडल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करून न्यायालयीन अवमानाची कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदन सादर करताना गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष मनोज गेडाम, सामाजिक कार्यकर्ता संतोष मनोहर, रुग्णसेवक संघपाल बारसे यांच्यासह संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते. “यवतमाळच्या गोरगरीब रुग्णांना न्याय मिळेपर्यंत गुरुदेवचा लढा थांबणार नाही,” अशी ठाम भूमिका संघाने मांडली आहे.

## भीषण अपघात: राजू डफ यांचे निधन

**▸विदर्भ केसरी। वणी**



वणी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक राजू उर्फ राजेश वामनराव डफ (५४) यांचे बुधवारी दुपारी एका दुचाकी अपघातात दुःखद निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण वणी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजू डफ हे बुधवारी सकाळी आपल्या स्प्लेंडर बाईकने काही कामासाठी झरीजामणी येथे गेले होते. काम आटोपून परत येत असताना दुपारी ३ ते ३.३० वाजेच्या दरम्यान जामणी ते शेकापूर मार्गावरील मुच्ची गावाजवळ एका वळणावर त्यांची बाईक घसरली. या भीषण अपघातात ते रस्त्याच्या कडेला फेकले गेले. त्यांच्या डोक्याला आणि चेहऱ्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, असे प्रत्यक्षदर्शी गावकऱ्यांनी सांगितले. राजू डफ यांचा राजकीय प्रवास उल्लेखनीय होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची वणी नगरपरिषदेवर सत्ता आली होती, तेव्हा ते स्वीकृत सदस्य म्हणून निवडून गेले होते. त्यानंतर मधल्या काळात ते राजकारणापासून काहीसे अलिप्त राहिले होते. मात्र, नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाकडून नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. अत्यंत मिलनसार आणि मोठा मित्रपरिवार असलेले राजू डफ हे वणीमध्ये सर्वांना परिचित होते. त्यांच्या निधनाची माहिती मिळताच पाटण पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी झरी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि भाऊ असा मोठा आप्तपरिवार आहे.

## मुलाचा विहिरीत बुडून मृत्यू

जामखेड : जामखेड तालुक्यातील धानोरा येथे नातेवाईकांकडे आलेल्या १७ वर्षीय मुलाचा विहिरीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. ५) सकाळी घडली. आवेज रिजवान पठाण (वय १७, रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर) असे मृत मुलाचे नाव आहे. या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आवेज हा ४ फेब्रुवारी रोजी मामेबहीणीच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त धानोरा येथे आला होता. वाढदिवसाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर तो आपल्या चुलत भावासह नातेवाईकांकडे मुक्कामी थांबला होता. गुरुवारी (दि. ५) सकाळी सुमारे आठच्या सुमारास आवेज हा चुलत भाऊ अन्वर शौकत पठाण व मित्र जय संतोष आरू यांच्यासोबत घराजवळील विहिरीवर पोहण्यासाठी गेला.

### महत्त्वाचे




## सीताबाई संगई शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन हर्षोल्हासात

**▸विदर्भ केसरी। संघरतन सरदार**

अंजनगाव सुर्जी शहरातील नामांकित असलेली सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित सीताबाई संगई प्राथमिक शाळा अंजनगाव सुर्जी शाळेत दरवर्षी प्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलन हर्षोल्हासात साजरा करण्यात येते . सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी चे उपाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष विवेक संगई , नगरपरिषद परिषद उपाध्यक्ष कार्यक्रमाचे उद्घाटन प्रियंका मालठाणे ,शाळेचे मुख्याध्यापक अनिल जुनघरे विद्यालयाचे मुख्याध्यापक राकेश दोंनगावकर ,पालक प्रतिनिधी रेखा टेकाडे प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. प्रमुख पाहुणे मान्यवरांनी मुलांना व पालक वर्गांना मार्गदर्शन केले.शिक्षक/ शिक्षिका, पाल्य मोठ्या संख्येने वार्षिक स्नेहसंमेलनात उपस्थित होते. वर्ग २ रा ३ रा आणि वर्ग ४ था मुला मुलींनी निरनिराळ्या प्रकारच्या डान्स मध्ये भाग घेऊन खूप छान नृत्य सादरीकरण करून हर्षोल्हासात स्नेहसंमेलन उत्साहात साजरा झाला. वर्ग शिक्षक/ शिक्षिका यांनी मुलांना मार्गदर्शन केले.



## अजित पवार यांना सर्व पक्षीय श्रध्दांजली!

**▸विदर्भ केसरी। बाळापूर**

राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित दादा पवार यांना तालुक्यातील वाडेगाव येथे सर्व पक्षीय श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. वाडेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालय सभागृहात आयोजित श्रध्दांजली सभेमध्ये प्रारंभी उपस्थितांनी दिवंगत अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच उपस्थितांनी दिवंगत अजित दादा पवार यांच्या कार्य शैली वर आपले विचार व्यक्त करताना सविस्तरपणे उहापोह केला. त्यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अरुण भाऊ काकड अशोक घाटोळ प्रकाश कंडारकर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) बाळापूर तालुका अध्यक्ष प्रशांत मानकर गाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सागर सरप ग्रामपंचायत सदस्य मुजाहिद भाई दिनेश धाडसे गजानन डोंगरे रुपेश जंजाळ पत्रकार चंदन जंजाळ सह आदींची उपस्थिती होती

# दिग्गजांचा भाजपात प्रवेश

## मुर्तिजापूरच्या राजकारणात मोठी उलथापालथ

**▸विदर्भ केसरी। संतोष भांडे**



मुर्तिजापूर तालुक्यातील राजकारणात महत्त्वाची घडामोड घडली असून विविध पक्षांतील प्रभावी पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याने स्थानिक राजकीय समीकरणे ढवळून निघाली आहेत. हा पक्षप्रवेश आमदार हरीश पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली व हस्ते पार पडला. या प्रवेशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने संघटनात्मक बळकटीकरणाची जोरदार सुरुवात केल्याचे मानले जात आहे.

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये संदीप जळमकर (महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, युवक राष्ट्रवादी काँग्रेस –शरद पवार गट), तुषार भुयार (शिवसेना शिंदे गट), रवी माडकर (शहर उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट) तसेच विष्णू लोडम (जिल्हा कार्याध्यक्ष, ओबीसी सेल, राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट) यांचा समावेश आहे. हे सर्व नेते त्यांच्या-त्यांच्या गटात संघटनात्मक काम करणारे आणि स्थानिक पातळीवर प्रभाव असलेले मानले जातात.

कार्यक्रमाला नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपनगराध्यक्ष रोहित अवल्वार, नगरसेवक भारत जेठवानी, नगरसेवक राम जोशी, नगरसेवक लखन मिलांदे, गटनेते गजानन नाकट, नजाकत खान, अमोल राऊत, अमोल प्रजापती व यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपस्थितीतून भाजपने शक्तीप्रदर्शनाचा संदेश दिल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) अतुल गावंडे (राष्ट्रवादी विद्यार्थी तालुका अध्यक्ष)यांच्यातील पदाधिकाऱ्यांनी थेट भाजपमध्ये प्रवेश केल्याने विरोधी पक्षांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याची चर्चा आहे. विशेषतः युवक नेतृत्व आणि ओबीसी घटकांशी संबंधित पदाधिकारी भाजपकडे वळल्याने सामाजिक समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रणनीती?

**■ राजकीय विश्लेषकांच्या मते, येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक पूर्वी भाजपने स्थानिक पातळीवर प्रभाव असलेल्या चेहऱ्यांना आपल्या गोटात खेचण्याची रणनीती राबवली आहे. मतदारांमध्ये मानसिक वातावरण तयार करणे, विरोधकांची संघटनात्मक ताकद कमी करणे आणि स्वतःची बूथ पातळीवरील रचना मजबूत करणे — या तिन्ही उद्दिष्टांचा या प्रवेशामागे विचार असल्याचे बोलले जाते.**

### आमदारांचा दावा

**■ यावेळी आमदार हरीश पिंपळे यांनी “भविष्यात आणखी काही दिग्गज नेते भाजपमध्ये प्रवेश करतील” असा दावा केला. या वक्तव्यामुळे आगामी काळात आणखी राजकीय घडामोडी घडण्याचे संकेत मिळत आहेत.**


### पुढील राजकारणाचे चित्र

**■ मुर्तिजापूरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून राजकीय पुनर्रचनेची प्रक्रिया सुरू असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नेतृत्वाचे स्थलांतर, गटबाजी आणि नव्या समीकरणांमुळे आगामी निवडणुका अधिक चुरशीच्या होण्याची चिन्हे आहेत. आज झालेला पक्षप्रवेश हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून, पुढील राजकीय दिशा ठरवणारी घटना म्हणून पाहिला जात आहे.**

## मूर्तिजापूरात जातीवाचक शिवीगाळ व मारहाण

### एकावर 'अॅट्रॉसिटी'सह विविध कलमान्वये गुन्हा दाखल.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापुर**



येथील महाकाली नगर भागात घराच्या बांधकामासाठी खोदकाम सुरू असताना, एका व्यक्तीने जेसीबी चालकाला मारहाण करून फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मुर्तिजापुर शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) आणि अनुसूचीत जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी प्रतिक दिनेश तायडे वय २६, रा. महाकाली नगर यांच्या आजोबा व आईच्या नावावर असलेल्या प्लॉट क्र. ५३ मध्ये घराचे बांधकाम सुरू आहे. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३:१५ वाजेच्या सुमारास जेसीबीच्या सहाय्याने पाया खोदण्याचे काम सुरू होते. यावेळी आरोपी जितेंद्र महादेवसा गुल्हाणे वय ५५, रा. देवका नगरी, याने घटनास्थळी येऊन विनाकारण जेसीबी ऑपरेटरला काठीने मारहाण केली. जेव्हा फिर्यादीने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपीने फिर्यादीची जात माहित असूनही त्यांना "महार-थेडग्या" अशी जातीवाचक हीन वागणूक देऊन शिवीगाळ केली. तसेच जेसीबी मालकास जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपीचा गुन्हेगारी इतिहास पोलिस तपासात समोर आले आहे की, आरोपी जितेंद्र गुल्हाणे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत:

अप क्र. २१५/२००९: कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ मारहाण व धमकी

अप क्र. २३५/२००६: कलम ३५३, १८६ शासकीय कामात अडथळा

अप क्र. १९६/१९९७: कलम ४४८, ५०६, ३२३ घरफोडी व मारहाण

पोलिस कारवाई

फिर्यादीच्या तक्रारीवरून मुर्तिजापुर शहर पोलिसांनी अप क्र. १३१/२०२६ नुसार कलम ११८(१), ३५१(२), ३५२ BNS २०२३ सह कलम ३(१) (r) (s) अॅट्रॉसिटी अॅक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक (PSI) आशिष शिंदे करत आहेत. ही कारवाई ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ASI गजानन थाटे यांनी नोंदवली आहे.

## बंगला ,गाडी ,पत्नी व पुत्र ,धन हे सौभाग्य नाही तर संतसंग हे सौभाग्य.... ह.भ.प.प्रशांत महाराज ठाकरे

### संत गजानन महाराज मंदिर येथे भागवत कथेचे आयोजन

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी**



:-आज आपण पहातो कि,काही श्रीमंत माणसे माझेकडे गाडी आहे, बंगला आहे, सुंदर पत्नी आहे, आज्ञाधारी पुत्र आहे,धनसंपत्ती आहे,अश्या बढाया मारतात. परंतु हे सारं एकदा मिळेलही पण संतसंग मिळणे दुर्लभ आहे. अश्या आशयाचे प्रतिपादन ह.भ.प.प्रा.डॉ. प्रशांत महाराज ठाकरे यांनी गजानन नगरी, माऊली फाटा,ब्राम्हणवाडा थडी याठिकाणी सुरु असलेल्या गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव सप्ताहामध्ये किर्तनात समाजप्रबोधन करतांना केले. ते पुढे म्हणाले की, आपल्याला हा देह ज्याने उधार वापरण्यास दिला त्याला विसरून केवळ मायेमध्ये अडकून पडल्याने हा जिव जन्माचा मुळ उद्देश विसरला आहे. त्याची आठवण करून देण्यासाठी हे किर्तन आहे.जिवनाचे हित करायचे असेल तर संतसंग करा .संताच्या सहवासात ईश्वर प्राप्ती होते. आपल्याला भाड्याने धनसंपत्ती पत्नी, पुत्र सर्व काही मिळेल पण संतसंग दुर्लभ आहे .तो मिळवण्याचा प्रयत्न करा.यातच खरे माणसाचे हित आहे .असे ते म्हणाले त्यावेळी पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरिक व गावकरी उपस्थित होते.

## भव्य महाआरोग्य रोग निदान व रक्तदान शिबिर

### ३१४ रुग्णांना उपचार, तर ६३ रक्तदात्यांचे महादान

**▸विदर्भ केसरी। कोंढाळी /--**




-जीवन आधार सामाजिक संस्था, नागपूर, शालिनीताई मेघे हॉस्पिटल नागपूर तसेच श्री संत गजानन महाराज ध्यान मंदिर, कोंढाळी यांच्या संयुक्त विद्यमाने संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनाच्या पावन औचित्याने कोंढाळी येथे भव्य व दिव्य महाआरोग्य रोग निदान शिबिर व रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. समाजातील गोरगरीब, गरजू व दुर्लक्षित घटकांना आरोग्यसेवेचा आधार मिळावा या उदात्त हेतूने हे शिबिर राबविण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष जीवनदादा जवंजाळ यांच्या दूरदर्शी मार्गदर्शनाखाली आयोजित या महाआरोग्य कॅम्पला कोंढाळी गावासह परिसरातील आजूबाजूच्या अनेक गावांतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये एकूण 675 नागरिकांनी विविध आजारांचे मोफत तपासणी व उपचारांचा लाभ घेतला, तर ६३ नागरिकांनी रक्तदान करून समाजासाठी जीवनदायी योगदान दिले. तर 153 पेशंट ला या ठिकाणी चेक करण्यात येऊन पुढील मोफत उपचार साठी नागपूर येथे रेफर करण्यात आले या महाआरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्वसाधारण तपासणी, रोग निदान, सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. गरीब व गरजू रुग्णांना आरोग्यविषयक योग्य दिशा मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण होते. “गोरगरीबांची सेवा व्हावी, त्यांना आरोग्याचा आधार मिळावा” हा सेवाभाव जीवनभाऊ जवंजाळ यांनी सातत्याने जोपासलेला असून, त्याचाच प्रत्यय या उपक्रमातून आला. या कार्यक्रमास भेट देण्यासाठी कोंढाळी येथील ठाणेदार धवल देशमुख सर, संस्थेचे मार्गदर्शक रमेशकाका जवंजाळ, डॉ. अश्विन रडके साहेब,विकास कामडी, संजय सवाई,कुणाल भांगे, राजेशराव गाडगे, सुभाषराव सांगोले, सौ अंजलीताई गाडगे , सौ मनीषाताई जवंजाळ, कु आर्या जवंजाळ अजय ठाकरे, नितीन देशमुख, प्रफुल मोहोड, संदेश जेस यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, श्री संत गजानन महाराज सेवेकरी व परिसरातील नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे शिबिराचे महत्त्व अधिकच वाढले.

### सामाजिक बांधीलकी

**■ समाजोपयोगी उपक्रमातून आरोग्य, सेवा आणि मानवतेचा संदेश देणारे हे शिबिर नागरिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून गेले. अशा उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत असून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविले जातील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.**

## कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे निर्देश

### नांदगावच्या स्वच्छता व आरोग्य सभापतींनी सौ.ज्योत्सना अमोल धवसे यांनी केली डंपिंग ग्राउंडची तातडीची पाहणी

**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर / तालुका प्रतिनिधी**



नांदगाव खंडेश्वर येथील नगरपंचायतीच्या नवनियुक्त स्वच्छता व आरोग्य सभापती सौ. ज्योत्स्ना अमोल धवसे यांनी पदभार स्वीकारताच शहरातील नागरिकांच्या स्वच्छतेसंदर्भातील गंभीर समस्यांची दखल घेत डंपिंग ग्राउंडची तातडीने पाहणी केली. यावेळी त्यांनी डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने व तात्काळ विल्हेवाट लावण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.डंपिंग ग्राउंडच्या आजूबाजूला वास्तव्यास असलेल्या नागरिकांना दुर्गंधी,आरोग्यविषयक त्रास अथवा कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी स्वच्छता विभागाने घ्यावी,असे निर्देश देताना सभापतींनी कचरा व्यवस्थापनात कसूर सहन केली जाणार नसल्याचा इशारा दिला.

याठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करणारी मशीन अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने ती तातडीने दुरुस्त करून सुरू करण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे आदेश देण्यात आले. नगरपंचायतीकडून गेल्या अनेक वर्षांपासून डंपिंग ग्राउंडच्या कायमस्वरूपी जागेचा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात आला असून,हा प्रश्न आता अधिक काळ रेंगाळू दिला जाणार नाही.सदर प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेणार असल्याचे आश्वासन यावेळी स्वच्छता व आरोग्य सभापती सौ.ज्योत्स्ना अमोल धवसे यांनी दिले. याशिवाय नांदगाव खंडेश्वर शहरातील प्रत्येक प्रभागात दररोज नियमित साफसफाई करण्यात यावी आणि येत्या महाशिवरात्री महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बसस्थानक परिसरापासून चांदूर रेल्वे रोडलगत साचलेले सर्व शेणखत तात्काळ उचलण्यात यावे, परिसरातील झाडेझुडपे तोडून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात यावा तसेच बसस्थानक परिसरात दररोज विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

शहराच्या कोणत्याही भागात कचरा दिसू नये यासाठी सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे. यासंदर्भात अधिकाऱ्यांनी दररोज सफाई कर्मचाऱ्यांकडून अहवाल घेऊन तो थेट सभापतींकडे सादर करावा, असे स्पष्ट निर्देशही यावेळी देण्यात आले.सभापती सौ. ज्योत्स्ना अमोल धवसे यांच्या या तातडीच्या पाहणीमुळे आणि ठोस निर्देशांमुळे नांदगाव शहरातील स्वच्छता व्यवस्थेत लवकरच सकारात्मक बदल घडून येतील अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## वऱ्हाडी भाषेतून प्रबोधन, व्यसनमुक्तीचा 'नाट्यरूपी' जागर

### मोबाईलचे दुष्परिणाम व्यसनाधीनतेवर राजेंद्र भटकर यांनी साधला चटपटीत संवाद.

**▸विदर्भ केसरी। मुर्तिजापूर**




सध्याच्या धावपळीच्या युगात तरुण पिढी आणि विद्यार्थी वर्ग मोबाईलच्या आहारी जात असून, तंबाखू-गुटख्यासारख्या व्यसनांचे प्रमाणही चिंताजनक रित्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, श्रीमती देवकाबाई पाटील विद्यालय, घुंगशी येथे 'व्यसनमुक्ती आणि मोबाईलचे दुष्परिणाम' या विषयावर एका विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रसिद्ध वक्ते राजेंद्र समाधान भटकर यांनी आपल्या खास वऱ्हाडी शैलीत आणि नाट्यरूपी संवादातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत मंत्रमुग्ध केले. हास्य-विनोदातून दिला मोलाचा संदेश विविध पुरस्कारांनी सन्मानित असलेले राजेंद्र भटकर यांनी सद्यपरिस्थितीवर बोट ठेवताना, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर होणारे मोबाईलचे दुष्परिणाम अत्यंत प्रभावीपणे मांडले. केवळ उपदेश न देता, त्यांनी हास्य-विनोद आणि छोट्या नाटिकांच्या माध्यमातून व्यसनाधीनतेमुळे आयुष्याची कशी धूळधाण होते, याची अनेक उदाहरणे दिली. आई-वडील, गुरुजन आणि वडीलधाऱ्या मंडळींचा आदर राखणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.


**■ विद्यार्थी झाले 'मंत्रमुग्ध'**

भटकर यांच्या संवादशैलीमुळे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सवयींबद्दल आत्मपरीक्षण केले. व्यसनांपासून दूर राहून उज्वल भविष्य घडवण्याचा 'साक्षात्कार' या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना झाला. वऱ्हाडी भाषेतील अस्सल ठसका आणि विनोदी उदाहरणांमुळे संपूर्ण कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. एम. घाटे यांनी पुढाकार घेतला. प्रसंगी शिक्षक ए. एन. जाधव, दिव्या गवळी, तसेच कर्मचारी गावंडे, वानखडे , आठवले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता अत्यंत भक्तीमय वातावरणात 'पसायदानाने' करण्यात आली. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर प्रगतीसाठी करावा, गुलाम होण्यासाठी नाही,असा सूर या कार्यक्रमातून उमटला

## कंपनीमध्ये आग!





**▸विदर्भ केसरी। महाड :**

महाड औद्योगिक वसाहती मधील प्रतीतयश कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एमबायो कंपनीमध्ये आज सायंकाळी साडेसहा नंतर ईटीपी प्लांट मध्ये आग लागल्याची घटना घडली असून कंपनीच्या अत्यावश्यक सेवेमार्फत तातडीने सुरू केलेल्या प्रयत्नांना यश प्राप्त झाल्याची माहिती कंपनी व्यवस्थापनाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान याआधी मध्ये दोन कामगार जखमी झाल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली असून त्यांना महाड उत्पादक संघटनेच्या एमआयडीसी मधील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याचे समजते. जखमी झालेल्या कामगारांची नावे शंतनुदास व सुदीप देबनाथ असल्याचे सांगण्यात आले आहे. या आगीचे वृत्त समजतात महाड एमआयडीसी फायर स्टेशन महाड नगरपालिका, लक्ष्मीआरगॅनिक, प्रिव्ही स्पेशालिटी आधी कंपन्यांच्या फायर फायटरने व स्थानिक ग्रामस्थांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तातडीचे प्रयत्न सुरू केल्याचे दिसून आले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## स्थानिक तक्रार समिती मधील अध्यक्ष पदाकरीता अर्ज करण्याचे आवाहन

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम 2013 अंतर्गत जिल्हास्तरावरील "स्थानिक तक्रार समिती" मधील अध्यक्ष पद रिक्त असल्यामुळे सदर समितीचे अध्यक्ष पदावर नाम निर्देशनाने नियुक्ती करावयाची आहे. अध्यक्ष पदाची पात्रता- सामाजिक कार्याचा 5 वर्षाचा अनुभव असलेल्या आणि महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या महिलांमधून अध्यक्षाची नियुक्ती करण्यात येईल. इच्छुक महिलांनी 15 फेब्रुवारी 2026 पर्यत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, गडचिरोली बॅरेक क्रं.1, खोली क्रं.26 कॉम्पलेक्स परिसर, गडचिरोली येथे वैयक्तिक माहिती, शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा अनुभव समर्थक कागदपत्रे जोडून अर्ज सादर करावा. असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा अधिकारी का.दि.म.लै.छ.अधि. यांनी कळविले आहे.

# संक्षिप्त




## मुगळा ते शेगाव पायदळ दिंडी सोहळ्याचे मेडशी स्वागत

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : विठ्ठल भागवत**

श्री संत गजानन महाराज संस्थान मुंगळा येथून पायदळ दिंडी सोहळ्याचे मेडशी येथील गोरखनाथ भागवत यांच्याकडून स्वागत व भोजनाची व्यवस्था श्री संत गजानन महाराज संस्थान मुंगळा ते शेगाव पायदल दिंडी सोहळा रवाना झाली. माघ वैद्य सप्तमी म्हणजेच 23 फेब्रुवारी 1878 रोजी बुलढाणा येथील शेगाव येथे गजानन महाराज दिगंबर अवस्थेत लोकांच्या दृष्टीत पडले गजानन महाराजांचा जन्म कुठे व कधी झाला हे अज्ञात आहे श्री गजानन महाराज यांचा प्रगट दिन हा एक शुभ दिवस मानला जातो याच दिवशी त्यांच्या प्रगट होण्याची आठवण केली जाते गण गण गणात बोते हा त्यांचा आवडता मंत्र होता हिंदू धर्मामध्ये गजानन महाराजांना गणेशाचा अवतार मानला जातो मुंगळा येथील दिंडी आयोजक अनंता कुटे एकनाथ जायभाये व गजानन सोनुने माऊली यांच्यावतीने 4 फेब्रुवारी रोजी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते सकाळी आठ वाजता श्री गजानन महाराज संस्थान येथून टाळ मृदंग विना याच्या गजरात पालखीची गावातून मिरवणूक काढण्यात आली होती एकनाथ जायभाये.अनंता कुटे.गजानन सोनवणे माऊली.व मुंगळा गावकऱ्याचे हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले गावांमध्ये सुद्धा ठिकठिकाणी पूजन करण्यात आले येथील माजी सरपंच प्रवीण वायकर अनंता कुटे गजानन सोनुने माऊली. एकनाथ जायभाय.बंडू राऊत. गणेश आघाव.गोपाल बोबडे.संतोष विठ्ठल भांदुर्गे. गजानन रामभाऊ राऊत.पिंटू दत्तराव राऊत. वसंतराव राऊत.श्याम भागवत.यांचे या पायदळ दिंडी सोहळ्यात प्रमुख उपस्थिती होती श्री गजानन महाराज संस्थान मुंगळा वरून सकाळी आठ वाजता पालखी मेडशी कडे मार्गस्थ झाली या पालखी सोहळ्यामध्ये मुंगळा भजनी मंडळ रेगाव गोखकसांगी या गावातील भजनी मंडळांनी सहभाग नोंदविला होता गायनाचार्य गजानन सोनुणेमाऊली.व मुंगळा भजनी मंडळाचे विशेष सहकार्य लाभले दुपारचे भोजन मेडशी येथील गोरखनाथ भागवत यांच्या शेतात भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती या दिंडी सोहळ्यामध्ये शेकडो भाविक भक्तांनी वारकऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.





## शालेय विद्यार्थ्यांच्या विषबाधा प्रकरणी दोघे निलंबित; तर पाच कर्मचाऱ्यांची वेतनवाढ रोखण्याचा आदेश..!

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : जिल्ह्याच्या भामरागड एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या लाहेरी येथील शासकीय आश्रम शाळेत शिक्षण घेणाऱ्या तब्बल ७० विद्यार्थ्यांना बुधवार २८ जानेवारी २०२६ रोजी अचानकपणे उलटी, मळमळ व तीव्र पोटदुखीचा त्रास सुरु झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. सदरचा प्रकार उघडकीस येताच लाहेरीच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात ३० विद्यार्थ्यांवर, तर भामरागड तालुक्याच्या ग्रामीण रुग्णालयात ४० विद्यार्थ्यांवर उपचार सुरु करण्यात आले. यातील ११ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तात्काळ पुढील उपचारार्थ अहेरी उपजिल्हा रुग्णालयात व काही विद्यार्थ्यांना नागपूरला हलविण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच प्रकल्प अधिकारी अमर राऊत, तहसीलदार किशोर बागडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी रोशन चव्हाण यांच्यासह अधिकाऱ्यांनी तातडीने रुग्णालय व आश्रम शाळेला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व विद्यार्थ्यांच्या उपचाराबाबत आरोग्य विभागाला आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या. अश्यातच आता विषबाधा प्रकरणी प्रकल्प अधिकारी अमर राऊत यांनी कारवाईचा बडगा उगारून कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी शाळेचे मुख्याध्यापक डी.जी. रापंजी आणि अधीक्षक एम.एम. पाटील यांचे तडकाफडकी निलंबित करण्यात आले. तर पाच कर्मचाऱ्यांची वेतनवाढ रोखण्याचा आदेश दिला आहे. यात महिला अधीक्षिका पी.एस. मडावी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी जी.एस. बोम्मावार, एस.एम.पवार, एस.एस. नैताम, सी.बी. कुळसंगे, डी.ए फ. कोकोडे यांची एक वर्षासाठी वेतनवाढ रोखण्यात आली आहे. कारवाईने शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.







## मौशी (पलसगड) येथे क्रांतिसूर्य भ. बिरसा मुंडा आदिवासी समाज बांधवांच्या वतीने धरती आबा बिरसा मुंडा पुतळा अनावरण सोहळा

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज - या कार्यक्रमास आमदार श्री. रामदासजी मसराम हे विशेष उपस्थित होते. यावेळी त्यांनी घटस्थापना व महागोंगो पूजेला उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले तसेच आदिवासी समाजाच्या शिक्षण व प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान आमदार रामदास मसराम यांच्या हस्ते स्पर्धा परीक्षेची पुस्तके विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली. यामुळे परिसरातील युवक-युवतींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर तुलावी, धनपाल मिसार सर, जयंत हरडे, नगरसेवक विकास प्रधान, माजी नगरसेवक उस्मान पठाण, ज्ञानदेव पिलारे ,भावेश मुंगणकर,सागर वाढई, वैभव परशुरामकर तसेच ग्रामस्थ, आदिवासी समाज बांधव, युवक, विद्यार्थी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# दारव्हा नगरपालिकेच्या पहिल्याच सभेत विकासाचा बळी

## मास्टर प्लॅनच्या नावाखाली सत्ताधा-यांचा राजकीय खेळ उघड

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी**

यवतमाळ /दारव्हा दारव्हा नगरपालिकेच्या पहिल्याच विशेष सभेत शहर विकासापेक्षा राजकीय शक्तिप्रदर्शनालाच प्राधान्य दिले गेल्याचे उघड झाले आहे.

नगराध्यक्ष सुनील चिरडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सभेत शहराचा तथाकथित विकासात्मक मास्टर प्लॅन बहुमताच्या जोरावर रेटून मंजूर करण्यात आला. मात्र या आराखड्यावरून सभागृहात प्रचंड गोंधळ, आरोप-प्रत्यारोप आणि टोकाची भूमिका पाहायला मिळाली. सत्ताधारी गटाने या मास्टर प्लॅनला "शहराच्या सर्वांगीण विकासाचा कणा" ठरवत पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, घरकुल, सौरऊर्जा अशा सुविधा दाखवून मंजुरी मिळवली. मात्र विरोधकांच्या मते हा आराखडा विकासासाठी नसून निवडक ठेकेदारांना फायदा पोहोचवण्यासाठी तयार करण्यात आला आहे. काँग्रेसच्या नगरसेवकांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेत स्पष्ट आरोप केला की, "विकासाच्या नावाखाली आर्थिक हितसंबंध जोपासले जात आहेत. पालकमंत्र्यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या निधीच्या कामांना जाणीवपूर्वक दुय्यम वागणूक दिली जात असून, शहराच्या गरजांऐवजी राजकीय अजेंडा पुढे रेटला जात आहे." या आरोपांमुळे सभागृहाचे वातावरण चांगलेच तापले. या टीकेला उत्तर देताना नगराध्यक्ष सुनील चिरडे यांनीही शब्दांची धार कमी केली नाही. "विकासाला विरोध करणाऱ्यांनी आधी जनतेसमोर आपली भूमिका स्पष्ट करावी. निधी आणणे आणि तो नियोजनबद्ध वापरणे हेच आमचे धोरण आहे," असे सांगत विरोधकांवर पलटवार केला. शिवसेना, भाजप आणि समाजवादी पक्षाच्या नगरसेवकांनी सत्ताधाऱ्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेत मास्टर प्लॅनला पाठिंबा दिला. अखेर संख्याबळाच्या जोरावर आराखड्याला मंजुरी मिळाली. मात्र काँग्रेसकडून या निर्णयाविरोधात लढा सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत. शहराच्या हितासाठी एकत्र बसून निर्णय घेण्याऐवजी पहिल्याच सभेत राजकीय



कुरघोडी, आरोप आणि अहंकाराचे प्रदर्शन झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. "विकासासाठी निवडून दिले की राजकारणासाठी?" असा थेट सवाल आता दारव्हा शहरातील नागरिक विचारत आहेत.

# खरकाडा बसस्टॉप जवळ दोन दूचाकीची समोरा समोर धडक

## एक गंभीर जखमी तर, दुसऱ्याचा पाय मोडला

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : तालुक्यातील खरकाडा येथील बस स्थानक जवळ कढोली कुरखेडाकडे जाणाऱ्या मार्गावर दोन दूचाकीची समोरा समोर झालेल्या भिषण धडकेत एक दूचाकी चालक युवक गंभीर रित्या जखमी झाला असून दुसऱ्या दुचाकी वाहन चालकासह पती व पत्नी जखमी झाल्याची घटना आज दिनांक ५ फरवरी गुरूवार रोजी दुपारी ३ वाजेचा सूमारास घडली आहे. प्राप्त माहीती नूसार गणेश केशव शेंडे (२५ ) मुक्काम खैरी हा आपले काम आटपून स्वगावी खैरी येथे येत असताना व दुसरा वाहन चालक तुलसीदास जीवन मारबते कढोली हा वाहन चालक आपल्या पत्नीसोबत कढोली येथे जात असताना खरकाडा बस स्थानक जवळ दोन्ही दूचाकीची समोरा समोर भिषण धडक झाली. यावेळी युवक गणेश केशव शेंडे यांच्या डोक्याला मार लागल्याने व तुलसीदास जीवन मारबते त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने खरकाड्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासुन अपघातग्रस्तांना उपजिल्हा रूग्णालय कूरखेडा येथे खाजगी वाहनाने भरती करण्या करिता सहकार्य केले. घटनेची माहिती मिळताच भाजपा तालुका अध्यक्ष माजी पंचायत समिती सदस्य चांगदेव फाये, नगरसेवक सागर निरंकारी, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर जगदीश बोरकर, पत्रकार प्रा. विनोद नागपुरकर यांनी वेळीच रुग्णालयात धाव घेत मदत केली. गणेश केशव शेंडे व तुलसीदास जीवन मारबते यांचावर प्राथमिक





उपचार करीत त्याना पूढील उपचारा करीता जिल्हा सामान्य रूग्नालय गडचिरोली येथे हलविण्यात आले आहे.

# भरधाव कारच्या धडकेत कापड व्यावसायिक दाम्पत्य जखमी

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली धानोरा मार्गावर बोदली- माडेतुकुम दरम्यान २ फेब्रुवारी रात्री साडेआठ वाजता एक धक्कादायक अपघात घडला. भरधाव कारने पाठीमागून येणाऱ्या ई-रिक्षाला जोरदार धडक दिली, ज्यामुळे कापड व्यावसायिक दाम्पत्य एकनाथ उदीरवाडे (६२) आणि त्यांची पत्नी निरुता उंदीरवाडे जखमी झाले. गोकुलनगरातील हे दाम्पत्य बामणी येथील मंडईत कापड विक्रीसाठी गेले होते. सायंकाळी मंडई आटोपून ते रिक्षाने परतत असताना बोदली गावाजवळ हा अपघात झाला.

रिक्षाला मागून आलेल्या भरधाव कारने धडक दिल्याने दोन्ही जण जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी तपास सुरू केला असून, कारचालकाच्या शोधासाठी कार्यवाही सुरू केली आहे.




# भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा स्पर्धा

## आदर्श महाविद्यालयातराज्यशास्त्र विद्यार्थी अभ्यास मंडळाचे आयोजन

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान अमृत महोत्सवी जनजागृती अभियानांतर्गत राज्यशास्त्र विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या वतीने भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा २०२५–२६ या स्पर्धेचे यशस्वी आयोजन नुकतेच करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे, लोकशाही मूल्ये, नागरिकांचे हक्क व कर्तव्ये यांची सखोल समज वाढविने व विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे हा होता.

या प्रश्नमंजुषेमध्ये भारतीय संविधानाची निर्मिती, मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, केंद्र-राज्य संबंध, निवडणूक व्यवस्था, न्यायपालिका आदी विषयांवर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने अशा प्रकारचे उपक्रम समाजात संविधानिक जाणीव निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरत असल्याचे मत स्पर्धा आयोजक





तथा राज्यशास्त्र विद्यार्थी अभ्यास मंडळाचे प्रभारी प्रा. प्रियंका ठाकरे व प्रा. अमित मलगाम यांनी व्यक्त केले. या स्पर्धेत तिन्ही विद्याशाखांतील ६६ विद्यार्थी सहभागी झालेत. यात अयान पठाण, बि एस्सी भाग-३ व पायल बांबोळे, बि ए भाग-३ यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय स्थान प्राप्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये राज्यशास्त्र विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतलेत. सहभागी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष शोभा प्राप्त झाली.

## अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाला 3400 कोटी रुपये वाटप

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

कुरखेडा : गडचिरोली भाजप अल्पसंख्याक



नेते आणि कुरखेडा नगर पंचायतीचे उपाध्यक्ष मोहम्मद कलाम (बबलू हुसैनी) यांनी केंद्र सरकारच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयासाठी ३,४०० कोटींच्या महत्त्वपूर्ण तरतुदीचे स्वागत केले. ही तरतूद अल्पसंख्याक समुदायाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाला नवीन चालना देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मोहम्मद कलाम (बबलू हुसैनी) यांनी सांगितले की, या अर्थसंकल्पाचा मुख्य उद्देश अल्पसंख्याक समुदायातील कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये हे सुनिश्चित करणे आहे. या रकमेचा मोठा भाग पंतप्रधान सार्वजनिक विकास कार्यक्रमासाठी (पीएमजेव्हीके) वाटप केला जाईल. या योजनेअंतर्गत खर्च केला जाईल, ज्याद्वारे अल्पसंख्याक बहुल भागात शाळा, आरोग्य केंद्रे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधा विकसित केल्या जातील. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाच्या अंतर्गत, मॅट्रिकपूर्व आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, उच्च शिक्षण सहाय्य आणि विविध शैक्षणिक सक्षमीकरण योजनांवर लक्षणीय खर्च केला जाईल. याचा थेट फायदा आर्थिकदृष्ट्या वंचित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना होईल. तसेच, राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास आणि वित्त महामंडळ अल्पसंख्याक समुदायातील तरुणांना आणि महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देईल. कर्ज, आर्थिक मदत आणि औद्योगिक विकास योजना देखील (एनएमडीएफसी) द्वारे राबविल्या जातील. केंद्र सरकारने दिलेले हे विकासाचे आश्वासन राज्य आणि जिल्हा पातळीवर प्रभावीपणे अंमलात आणले जावे अशी आशा व्यक्त करून, मोहम्मद कलाम (बबलू हुसैनी) म्हणाले की, हे बजेट निश्चितच अल्पसंख्याक समुदायाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना देईल.

# जंगली हत्तीचा धुमाकूळ ; आठ गावांतील शेतक-यांचे पीक उद्ध्वस्त

## हत्तींचा तात्काळ बंदोबस्त न झाल्यास आंदोलनाचा इशारा : जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे

**▶विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : मौजा चिंचोली, मोहटोला, बेलगाव, रानखेडा, मौशीखांब, मरेगाव चक, मरेगाव, चांभार्डा व खैरी रिठ या गावांच्या शिवारात जंगली हत्तीने धुमाकूळ घातल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हत्तीच्या अचानक झालेल्या प्रवेशामुळे उभी पिके तुडवली गेली असून अनेक शेतांमधील पीक पूर्णतः उद्ध्वस्त झाले आहे. या घटनेमुळे संबंधित गावांतील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीच अवकाळी पाऊस, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अस्थिरतेमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या जंगली हत्तीच्या हल्ल्यामुळे मोठा आर्थिक फटका बसला आहे. काही ठिकाणी रात्रीच्या वेळी हत्ती शेतात शिरल्याने नागरिकांच्या जीवितासही धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित गावांतील नागरिकांनी गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या घटनेची दखल घेत जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी वन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून झालेल्या नुकसानीची तात्काळ भरपाई देण्यात यावी, अशी मागणी केली. तसेच जंगली हत्तींचा त्वरित बंदोबस्त करून भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात, अन्यथा हजारोंच्या संख्येने शेतकऱ्यांसोबत आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. यावेळी तालुकाध्यक्ष गडचिरोली वसंत राऊत , पांडुरंग समर्थ (अध्यक्ष, वन समिती मौशीखांब), बंडुजी लटारे (अध्यक्ष, वन समिती बेलगाव), शंकर नैताम (माजी पंचायत समिती सदस्य), जगदीश



कुणघाडकर, पुंडलिक कोठारे (उपाध्यक्ष, वन समिती बेलगाव), अमृत वासेकर, परसराम कोठारे, शंकरराव भांडेकर, नाजुकराव जुमनाके, मुकुंदा नैताम, बाबुराव चौधरी, बाबुराव हरडे, भक्तदास खेवले, राजेश नानाजी, प्रदीप टेकाम, उमाजी वलादी आदी उपस्थित होते.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY
गडचिरोली GOOD MORNING

## ऑनलाईन सेवा देणाऱ्या ईच्छूक व्यक्ती/ संस्था यांनी अर्ज/निविदा सादर करण्याचे आवाहन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : उप अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालय आरमोरी येथे भू-प्रणाम केंद्र स्थापन करण्यात असून ते चालविण्यासाठी खाजगी संस्था जसे सेतु सेवा केंद्र, महा ई सेवा केंद्र इ. ईच्छूक यांचेकडून निविदा मागवून निवड केली जाणार असून त्यासाठी लघु निविदा कार्यालयाचे नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उप अधीक्षक भूमि अभिलेख, आरमोरी कार्यालयांत स्थापन भू-प्रणाम केंद्रामार्फत सर्व प्रकारचे ऑनलाईन सेवा पुरविण्याचे कामे करावयाची आहेत. जसे भूमि अभिलेख विभागाचे ऑनलाईन सेवा जसे मिळकत पत्रिका, स्कॅन अभिलेख, नकाशा, मोजणी अर्ज इ. सेवा ऑनलाईन पुरविणे. तसेच भूमि अभिलेख विभागासह इतरही विभागाचे ऑनलाईन सेवा शासन निर्णयातील शुल्कामध्ये नियमानूसार पुरविली जाणार आहेत. त्याकरिता ईच्छूक ऑनलाईन सेवा देणाऱ्या संस्था/ व्यक्ती कडून अर्ज मागविण्यांत येत आहे. व त्याची कार्यवाही चालू आहे. तरी, ऑनलाईन सेवा देणाऱ्या ईच्छूक व्यक्ती/ संस्था यांनी अर्ज/निविदा सादर करावे, असे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, गडचिरोली यांनी सूचित केलेले आहे.

## संक्षीप्त



### गडचिरोली येथे प्रभू विश्वकर्मा जयंती साजरी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : महाराष्ट्र राज्य लोहार समाज संघ, गडचिरोली यांच्या वतीने प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सव मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ रोज मंगळवारला संस्कृती मंगल कार्यालयाच्या मागील सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गडचिरोली विधानसभा संघटक नंदूभाऊ कुंमरे होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात समाज संघटन अधिक बळकट करून एकत्रितपणे समाज प्रगतीसाठी काम करण्याचे आवाहन केले. तर प्रमुख वक्ते म्हणून वैदर्भीय गाडी लोहार व तत्सम जाती महासंघ, नागपूर सचिव सुरेश मांडवगडे यांनी समाज संघटन, प्रगती तसेच नव्या पिढीच्या सक्रिय सहभागाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा संजय मांडवगडे यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष गडचिरोली धर्मदास नैताम, भाजपा कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष सुधाकर पेटकर, समाजसेवक मेघनाथजी बावणे, प्रभु वकेकार, विलास बावणे, वामन सोनटक्के, सोमनाथ उईके, धनंजय हजारे, श्रीकांत कोसरे, भूषण पेटकर, प्रवीण मेश्राम, अजय हजारे, पुरुषोत्तम बिदेकर, सुनील बावणे, देशोन्नती वार्ताहर नरेश बावणे, एकनाथ कोसरे, आनंदराव मांडवगडे, राहुल मांडवगडे, सचिन मांडवगडे, मंगेश हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती.
महिला वर्गाचाही लक्षणीय सहभाग लाभला. यामध्ये मंदा मांडवगडे, कल्पना नैताम, घुग्गुसकर, प्रतिभा हजारे, लता सोनटक्के, स्वातीताई चंदनखेडे, केडझरकर वकेकार, पोर्णिमा आत्राम, सोनू मांडवगडे, स्वीटी पेटकर, श्रद्धा नैताम, विद्या कुमरे, शुभांगी कोसरे, बावणे यांचा समावेश होता.
प्रभू विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी लोहार समाजातील विविध घटकांतील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या उत्स्फूर्त व बहुसंख्येने लाभलेल्या सहभागामुळे प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सव यशस्वी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ह्या कार्यक्रमाचे आयोजन नरेश हजारे,नरेश केळझरक,अतुल सोमनाथ उईके यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा संजय मडावी यांनी केले तर आभार प्रदर्शन अतुल नैताम यांनी केले.






### उपजिल्हा रुग्णालय कुरखेडा येथे कर्करोग (cancer) आजाराबद्दल जनजागृती

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : दिनांक 4 फेब्रुवारी 2026 ला उपजिल्हा रुग्णालय कुरखेडा येथे जागतिक कर्करोग नियंत्रण दिनाचे औचित्य साधून रुग्णांकरिता कर्करोग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वैधकीय अधीक्षक डॉ. अमित ठमके होते तर प्रमुख अतिथी सहाय्यक अधिशेविका खवड, दंतशल्य चिकित्सक डॉ.मनोज मार्गीया, दंत शल्य चिकित्सक डॉ. अश्विनी पारधी मॅडम, वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदीश बोरकर, परिसेविका मेश्राम मॅडम आयसीटीसी समुपदेशक शामला कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मार्गदर्शक वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कर्करोगाचे कारणे लक्षणे निदान व उपचार तसेच कर्करोगापासून बचावासाठी संतुलित आहार, योग प्राणायाम या जीवन शैलीचा अवलंब करण्यासंबंधीत तसेच वाईट व्यसने तंबाखू , खर्रा, गुटखा दारू या पासून दूर राहण्यासंबंधी रुग्णांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे संचालन आर के एस के समुपदेशक मच्छिंद्र उके यांनी केले, व आभार प्रदर्शन सुषमा झंजाळ यांनी केले. निशा चचाने NCD समुपदेशक आणि ममिता कन्नाके यांनी कार्यक्रमा चे आयोजन केले. तसेच रश्मी मोगरे, सपना मॅम, दिक्षा जोगे, प्रियांका बळगे, कविता, राकेश आणि उपजिल्हा रुग्णालय कुरखेडा येथील सर्व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

# दारूच्या नशेत टँकर चालवून 16 वर्षीय विद्यार्थिनीला चिरडले

## जागीच मृत्यू झाल्याने कंत्राटदार कंपनीवरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : गडचिरोली-धानोरा राज्य महामार्गावर पोचमार्गावर सुरु असलेल्या रस्ता बांधकामादरम्यान पाणी मारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या टँकरने चिरडल्याने 16 वर्षीय शालेय विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना धानोरा रोडवरील जांभळी परिसरात दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास घडली. या घटनेने संपूर्ण गडचिरोली जिल्हा हादरून गेला असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मृत विद्यार्थिनीचे नाव रिया श्रावण पदा (वय 16) असे असून ती कारवापा येथील रहिवासी होती. रिया ही कारवापा येथील शाळेत शिक्षण घेत होती. शाळा सुटल्यानंतर ती जांभळी मार्गे सायकल ने आपल्या घरी परतत असताना जांभळी गावाच्या सुरुवातीला ही दुर्दैवी घटना घडली. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, रस्ता बांधकामाच्या ठिकाणी पाणी मारण्याचे काम करणारा टँकर चालक दारुच्या नशेत असून बेदरकारपणे, महामार्गासारख्या वेगाने वाहन चालवत होता. याच दरम्यान त्याने नियंत्रण सुटल्याने टँकर थेट रियाच्या अंगावर घातला. या भीषण धडकेत रियाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात टँकर वाहनाचे चाक रिया या डोक्यावरुन गेल्यामुळे तिचा पूर्ण चेहरा चेंदामेंदा झालेला दिसत होता.



■ संतप्त नागरिकांकडून चालकाला चोप...
घटनेनंतर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला. मृतदेह पाहताच संतप्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी दारुच्या नशेत असलेल्या टँकर चालकाला पकडून चांगलाच चोप दिला. काही वेळाने पोलीस घटनास्थळी पोहोचले; मात्र तोपर्यंत परिस्थिती चिघळली होती.

### लोकांचे जीव स्वस्त झाले आहेत का?

■ दररोज दोन ते चार अपघाती मृत्यू होत असतांनाही प्रशासन गंभीर भूमिका घेत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष आहे. "गडचिरोली जिल्ह्यात लोकांचे जीव इतके स्वस्त झाले आहेत का?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या पालकत्वाखालील जिल्ह्यातच जर वाहतूक व सुरक्षिततेची अवस्था अशी असेल, तर जिल्ह्याच्या एकूण सुरक्षेचे तीन तेरा वाजायला वेळ लागणार नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर पोलीस यंत्रणा नेहमीप्रमाणे उशिरा घटनास्थळी पोहोचल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रिया पदा हिच्या मृत्यूने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

### महामार्ग विभाग व पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह...?

■ राज्य महामार्गाचे बांधकाम सुरु असताना महामार्ग पोलीस, वाहतूक पोलीस अथवा परिवहन विभागाकडून कोणतीही प्रभावी नियंत्रण यंत्रणा राबवली जात नसल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. मोठमोठी वाहने बेदरकारपणे धावत असल्याने जिल्ह्यात वारंवार अपघात होत असून, निष्पाप नागरिकांचे जीव जात आहेत.


### सुरक्षा उपायांचा अभाव, सूचनाफलक नाहीत

■ घटनास्थळाची पाहणी केली असता रस्ता बांधकाम सुरु असताना कोणतेही धोक्याचे सूचना फलक, दिशा दर्शक चिन्हे किंवा वाहतूक नियंत्रण व्यवस्था आढळून आली नाही. पादचारी व वाहनचालकांसाठी आवश्यक असलेली कोणतीही तांत्रिक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. साखेरा जांभळी या रस्त्याच्या बांधकामाचा ठेका डी.सी. गुरुबक्षानी कन्स्ट्रक्शन कंपनी यांना पेटी कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने देण्यात आला आहे. नागरिकांचा आरोप आहे की, दारुच्या नशेत वाहन चालवणाऱ्या चालकावरच नव्हे तर अशा चालकाला कामावर ठेवणाऱ्या व सुरक्षा उपाय न राबवणाऱ्या कंत्राटदार कंपनीवरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.

## गडचिरोली जिल्हा सीमेलगत सुरक्षा दल व माओवादी चकमकीत एक माओवादी ठार

**एक जवान जखमी.!**

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**



गडचिरोली : नारायणपूर-गडचिरोली जिल्हा सीमेवरील जंगल परिसरात सुरक्षा दल व माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत एका पुरुष माओवादीला ठार करण्यात आले. या कारवाईत माओवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करण्यात आले असून घटनास्थळावरून एके-47 व एसएलआर रायफलसह मोठ्या प्रमाणात माओवादी साहित्य जप्त करण्यात आले आहे. 3 फेब्रुवारीच्या संध्याकाळी कंपनी क्रमांक 10 चे उर्वरित माओवादी सदस्य तसेच छत्तीसगडमधील अज्ञात माओवादी दलमच्या हालचालींबाबत मिळालेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड यांच्या नेतृत्वाखाली मोठे अभियान राबविण्यात आले. त्याच रात्री 14 सी-60 पथकांसह फोदेवाडा गावाच्या काही किलोमीटर अंतरावर, नारायणपूर-गडचिरोली सीमेवर व्यापक शोधमोहीम सुरु करण्यात आली.

काल दिवसा माओवाद्यांशी काही काळ चकमक झाली. या कारवाईदरम्यान माओवाद्यांचे दोन तळ उद्ध्वस्त करण्यात आले. मात्र, घनदाट जंगलाचा फायदा घेत माओवादी पसार झाले. आज सकाळी अभियान अधिक तीव्र करत अतिरिक्त 04 सी-60 पथक व सीआरपीएफ क्यूएटीचे 01 पथक क्षेत्रात दाखल करण्यात आले. सकाळपासून अधूनमधून चकमकी सुरु असून त्यात एका पुरुष माओवादीचा मृतदेह आढळून आला. मृत माओवादीची ओळख अद्याप पटलेली नाही. आणखी काही माओवादी जखमी किंवा ठार झाल्याची शक्यता असून त्याची पडताळणी सुरु आहे.

दरम्यान, आज संध्याकाळी उशिरा माओवाद्यांनी केलेल्या जोरदार गोळीबारात सी-60 पथकातील एक जवान गोळी लागून जखमी झाला. जखमी जवानाला तातडीने बाहेर काढून पुढील उपचारासाठी पाठविण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर जंगलपरिसरात शोधमोहीम सुरु असून, मोहीम पूर्ण झाल्यानंतर गडचिरोली पोलीस दलाकडून सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ग्रामपंचायत जवेली बुजला सुहास गाडेंची भेट

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



एटापल्ली : दिनांक 04/02/2026 रोजी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जिल्हा परिषद गडचिरोलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे साहेब, गटविकास अधिकारी आंधळे साहेब, पंचायत विस्तार अधिकारी रवींद्र कुनघाडकर, तसेच प्रशासकीय अधिकारी मडावी साहेब (पंचायत समिती एटापल्ली) यांनी ग्रामपंचायत जवेली बुज येथे भेट दिली. या प्रसंगी ग्रामपंचायत जवेली बुज यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत राबविलेल्या विविध विकासकामांची पाहणी करण्यात आली. त्यामध्ये - श्रमदानातून गटारे साफसफाई व गाव स्वच्छता. श्रमदानातून विकसित क्रिडांगण. क्रिकेट ग्राउंड, कबड्डी ग्राउंड, खो-खो ग्राउंड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर व पसरबाग, ग्रामपंचायत फळबाग व परसबाग, वनराई बंधारा बाबू हस्तकला प्रशिक्षण केंद्र, या सर्व ठिकाणांना मान्यवरांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. मान्यवरांचे स्वागत आदिवासी पारंपरिक पद्धतीने वृक्ष देऊन ग्रामपंचायत सरपंच यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जवेली बुज, अंगणवाडी केंद्र, जवेली बुज, तसेच ग्रामपंचायत कार्यालय, जवेली बुज येथे भेट देऊन मार्गदर्शन करण्यात आले व ग्रामपंचायतच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी ग्रामपंचायत सरपंच कु. अलिशाताई गोटामी, ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप बेलखेडे, उपसरपंच दामजी हिचामी, ग्रामपंचायत सदस्य कु. संगीता हिचामी, नेवसू नरोटे, सुमित्रा हिचामी, कु. अनिता तोफा, गाव पाटील मुरा पोटावी, ग्रामपंचायत मोबिलायझर बुधु पोटावी, ग्रामरोजगार सेवक गणू नैताम, महिला बचत गटाच्या अध्यक्षा श्रीमती शेवता पोटावी, समा पोटावी, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला मंडळी, तरुण मंडळी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. या भेटीच्या समारोपप्रसंगी पंचायत समिती एटापल्लीचे गटविकास अधिकारी आंधळे साहेब यांनी सर्व मान्यवरांचे व ग्रामस्थांचे आभार मानले.

# कोया कृषी कुंभातील प्रदर्शन व चर्चासत्रांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा : कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल

## समृद्ध गडचिरोलीसाठी शाश्वत शेती, आधुनिक तंत्रज्ञान व 'गडचिरोली ब्रँड' वर भर

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वाधिक नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध, जंगलव्याप्त व कृषी क्षमतेने परिपूर्ण जिल्हा असून 'समृद्ध गडचिरोली' घडविण्यासाठी शाश्वत शेती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, थेट शेतकरी मदत आणि स्वतंत्र 'गडचिरोली ब्रँड' उभारणे आवश्यक आहे. या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या कोया कृषी कुंभ या आधुनिक तंत्रज्ञान प्रदर्शन व चर्चासत्रांचा शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केले. ॲड. आशिष जयस्वाल 'कोया कृषी कुंभ' या कृषी प्रदर्शन व चर्चासत्रांच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, नगराध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता देवाजी तोफा, सहायक जिल्हाधिकारी एम. अरुण विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी प्रिती हिरळकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कृषी तज्ज्ञ व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

गडचिरोलीला शासनाचे विशेष प्राधान्य ॲड. जयस्वाल म्हणाले की, गडचिरोलीतील प्रत्येक उत्पादनाला त्याच्या नैसर्गिक शुद्धतेमुळे राज्यात व देशात वेगळे आकर्षण आहे. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने गडचिरोलीच्या सर्वांगीण विकासाला विशेष प्राधान्य दिले असून, 'विकसित महाराष्ट्र 2047'च्या दिशेने गडचिरोली महत्त्वाची भूमिका बजावेल. फक्त उत्पादन वाढवणे हा शेतीचा उद्देश नसून, मागणी–पुरवठ्याचा समतोल राखत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आवश्यक आहे. रासायनिक खतांवर अवलंबित्व कमी करून सेंद्रिय, विषमुक्त व पर्यावरणपूरक शेतीकडे वळण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. कृषी विभागाचे नवे व्हिजन 'शाश्वत शेती आणि समृद्ध शेतकरी' असेल, असे त्यांनी सांगितले.

आधुनिक तंत्रज्ञान व चर्चासत्रांचे महत्त्व कोया कृषी कुंभामध्ये आधुनिक कृषी यंत्रसामग्री, सुधारित बियाणे, डिजिटल शेती, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर, सेंद्रिय शेती पद्धती व मूल्यवर्धन यांचे सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच विविध विषयांवरील चर्चासत्रांमधून तज्ज्ञांकडून थेट मार्गदर्शन मिळत असून, शासनाच्या कृषी योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे. या संधीचा शेतकऱ्यांनी पूर्ण लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

गडचिरोली जिल्ह्यात कृषी योजनांची संपूर्ण मॅपिंग करून सॅच्युरेशन मोडमध्ये काम केले जाणार आहे. सिंचन सुविधा, विहीर, बोरवेल, पंप, पाईपलाईन, ठिबक व तुषार सिंचन यांचा विस्तार करण्यात येणार आहे. लाभ देण्यासाठी लॉटरी पद्धत बंद करून 'पहिले येणाऱ्यास पहिले लाभ' याप्रमाणे सर्व पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासन कृषी विभागात २५ हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात येत असून, शेतकऱ्याला दीर्घकालीन फायदा होईल अशा मालमत्ता निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात गडचिरोलीतील ५६२ गावांचा समावेश असून, ही सर्व गावे समृद्ध करण्याचे उद्दिष्ट आहे. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना ही गडचिरोलीसाठी गेम चेंजर ठरणार असून, यावर्षी शंभर टक्के आदिवासी शेतकऱ्यांना बोरवेल व सोलर पंप देण्याचे नियोजन आहे. साडेसात हॉर्सपावर कृषी पंपांचे वीज बिल माफ करण्यात आले असून, भविष्यात सौर ऊर्जेकडे वाटचाल केली जाईल. गडचिरोलीतील नैसर्गिक व विषमुक्त उत्पादनांचा 'गडचिरोली' ब्रँड तयार करून त्याचे ब्रँडिंग व मार्केटिंग करण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन समिती व जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा निधी अधिकाधिक कृषी क्षेत्राकडे वळवून बाजाराभिमुख शेतीला चालना दिली जाईल. आत्मनिर्भर जिल्ह्यातूनच विकसित महाराष्ट्र व विकसित भारत घडेल, यासाठी सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी व जनतेने एकदिशेने काम करून 'विकसित गडचिरोली'चा रोडमॅप तयार करावा, असे आवाहन ॲड. जयस्वाल यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा व आमदार डॉ. नरोटे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करतांना कृषी क्षेत्र विकसित करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान या प्रदर्शनातून जाणून घेण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे अनुदान व मदतीचे धनादेश वितरित करण्यात आले. राज्यमंत्री यांनी यावेळी विविध स्टॉलची पाहणी केली. या प्रदर्शनात एसी ट्रॅक्टर पहिल्यांदाच पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.












# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यांनी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**